दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २२६ । शनिवार ३० मे २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

**ज्ञानेश्वरी व सहजयोग...** अनेक हजारो वर्षांपासनं आपल्या देशामधे विशेषत: ह्या महाराष्ट्रात, ह्या संतभुमिमधे संतानी अस संगितलेल आहे की, अवघाची संसार सुखाचा करीन ! इतकच नव्हे तर पसायदान म्हणून जे काही ज्ञानेश्वरांनी लिहलय ते सुद्धा वर्णन आपल्याला खर वाटत नाही की , जे जो वांछील ते तो लाहो ! हे कस होणार?, ह्याला मार्ग काय ? जी जी वर्णन अशा परमेश्वरी साम्राज्याची आपल्या शास्त्रात करून ठेवलीय. त्यासाठी मनुष्य नेहमी धडपडत असतो की, अस साम्राज्य आलं पाहिजे,पण ते येणार कस? ते कसे होणार ? मनुष्य होता तसाच आहे. तेव्हा त्याला काहीतरी कारण असलं पाहीजे, ते कारण अस आहे आपलं अज्ञान. आणि हे अज्ञान एवढ्यासाठी आहे की ,कुंडलिनीबद्दल उघड करून बोलणं झालं ते आपल्या महाराष्ट्रात ज्ञानेश्वरांनी केलं . त्यांनी सहाव्या अध्यायात सांगितलेलं आहे की , कुंडलिनी ही चक्रवर्तीची शोभा आहे . आणि ती एकदा जागृत झाली म्हणजे मनुष्याला परमार्थ मिळतो .परमअर्थ ,त्याला अर्थ लागतो तो समर्थ होतो . पण ही कुंडलिनी जी सहाव्या अध्यायात वर्णिलेली आहे ती आपण का जाणत नाही कारण सहावा अध्याय वाचायचा नाही असं सगळ्यांनी सांगून ठेवलयं ,का वाचायचं नाही असा प्रश्न आपण विचारत नाही .



'सहजयोग'
भाग ६६

०६ जानेवारी १९८६, सांगली अधिक माहितीसाठी
www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# नोंदी सापडलेल्या ५८ लाख मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या

## जरांगे पाटील आंदोलनावर ठाम; विखे पाटलांच्या शिष्टमंडळाने केली चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

संभाजीनगर : राज्य सरकार म्हणतंय कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्या, मग त्या जाहीर करा, त्या सर्वांना प्रमाणपत्र द्या अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. आधीच्या राज्यकर्त्यांनी मराठ्यांसाठी काही केलं नाही, म्हणून तुम्हाला सत्तेत आणलं, मराठ्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे म्हणाले.

हैदराबाद गॅझेटप्रमाणे सातारा गॅझेटचा जीआर काढा, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार हे लेखी द्या, अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे यांनी केली. मराठा समाजासाठी तुम्हाला जेवढं शक्य आहे तेवढं करा, मी आंदोलन करणारच, असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे ३० मे पासून अंतरावाली सराटीमध्ये आंदोलन करणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली आणि आरक्षणाच्या मागणीवर चर्चा केली. या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड होते.

शिष्टमंडळासोबत चर्चा करताना मनोज जरांगे म्हणाले की, राज्य सरकारने या आधी हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला, पण सातारा गॅझेटचा जीआर अद्याप काढला नाही. सरकारने कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्याचं सांगितलं होतं, मग त्यांना अद्याप प्रमाणपत्रं का दिली नाहीत? राज्यात ज्या ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्या आहेत त्यांची यादी द्या. त्या ५८ लाखांपैकी किती जणांना



कुणबी प्रमाणपत्र दिली याची माहिती द्या.

मराठवाड्यात ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नका असे आदेश मुख्यमंत्री कार्यालयातून आले असल्याचा आरोप यावेळी मनोज जरांगे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे जाण्याचं कुणीचं धाडस नाही. त्यामुळे त्यांनी हैदराबाद गॅझेट लागू करा असा आदेश द्यावा, उद्या सकाळपासून कुणबी प्रमाणपत्राचं वाटप होईल असं जरांगे म्हणाले.

नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबवणार नाही, हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करणार असं लेखी द्या, अशी मागणी यावेळी मनोज जरांगे यांनी केली.

### ३९ लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप पूर्ण

राज्यात आतापर्यंत ३९ लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप केलं, त्याची यादी देतो. सरकारचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न आहे. ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांची गावनिहाय, जिल्हानिहाय माहिती देतो. आपल्या विश्वासाला तडा देऊ जाणार नाही. १९९४ मध्ये त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी चूक केली. मराठा समाजाला ओबीसीमध्ये घातलं नाही. सातारा गॅझेटचा प्रस्ताव तयार झाला आहे. पण आगोदर हैदराबाद गॅझेटच्या विरोधात न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्याला स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे आता लगेच सातारा गॅझेट आणलं तर त्यालाही स्थगिती मिळू शकेल अशी भीती आहे.

**– राधाकृष्ण विखे पाटील,**
**मराठा आरक्षण उपसमिती अध्यक्ष**
**तथा जलसंधारण मंत्री**

दारुकांडाने उद्योगनगरी हादरली...

# विषारी दारूमुळे १६ जणांचा मृत्यू

### सख्ख्या भावांनी गमावला जीव, वडिलांनी गमावली दृष्टी



**अटक आरोपींची नावे**
१. योगेश वाशखेडे
२. राधेश्याम प्रजापती
३. कर्नलसिंह विरखा
४. गुरमितसिंह विरखा
५. कल्पेश अग्रवाल
६. अरिहंत धोत्रे
७. आकाश जाधव
८. अशोक हांडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे सुरू झालेल्या मृत्यूच्या सत्राने संपूर्ण उद्योगनगरी हादरली आहे. दापोडी, फुगेवाडी, हडपसर, पांढरे मळा, आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक परिसरात शोककळा पसरली असून आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अनेक कुटुंबांचा आधार हिरावला गेला असून, परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दारुकांडातील सर्वात हृदयद्रावक घटना फुगेवाडी येथे घडली. विषारी दारू प्रकरणात विजय राठोड आणि विजू (पान ४ वर)

**■ ही एक प्रकारे हत्या आहे. विषारी दारू तयार करणाऱ्या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली असून आणखी काही आरोपींना अटक होण्याची शक्यता आहे.**

**– देवेंद्र फडणवीस**
**राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री**

## महत्वाचे..

### महाराष्ट्रात पाऊस उशीरा येणार

पुणे : केरळमध्ये मान्सून कधी धडकणार, याबाबतची निश्चित तारीख भारतीय हवामान विभागाकडून अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांची पावसाची प्रतीक्षा आणखी लांबत चालली आहे. हवामान विभागाने गुरुवारी पुढील दोन आठवड्यांचा हवामान अंदाज (पूर्वानुमान) जाहीर केला आहे. त्यानुसार, ११ जूनपर्यंत महाराष्ट्रातील किनारपट्टीच्या भागात तसेच राज्याच्या अंतर्भागात अत्यंत अल्प पावसाची शक्यता आहे. या कालावधीत देशातील बहुतांश भागांमध्येही फारसा पाऊस नसेल. दरम्यान, मुंबईत मान्सून दाखल होण्याची सरासरी तारीख ११ जून मानली जाते. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रातील किनारपट्टीचा भाग आणि उत्तर मध्य महाराष्ट्रात ४ जूनपर्यंत काही ठिकाणी दररोज १० मिलीमीटर इतका तुरळक पाऊस पडू शकतो. त्यानंतरच्या आठवड्यात, म्हणजेच ४ ते ११ जून या कालावधीत किनारपट्टीवर पावसाचा जोर थोडा वाढण्याची शक्यता आहे. या काळात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पावसाची व्याप्ती वाढू शकते.

# जिल्ह्यातील ८७० गावांची आरक्षण सोडत जाहीर

**श्रीरामपूर : भरत थोरात**

राज्यातील सन २०२४ ते २०२५ सन २०२६ या कालवधीत मुदत संपलेल्या जिल्ह्यातील तब्बल ८७० ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला.

ग्रामीण भागातील राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहेत.विशेष म्हणजे, यापूर्वीच आरक्षण सोडत झालेल्या १०० ग्रामपंचायतीसाठी नव्याने सोडत काढण्याचे आदेशही देण्यात आल्याने इच्छुकांचे सध्या गणिते पुन्हा बदलणार आहेत.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १२ जूनपर्यंत संबंधित गावांमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन आरक्षण सोडत प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

त्यानंतर १० जुलै रोजी अंतिम प्रभागनिहाय आरक्षण जाहीर होणार आहे.यापूर्वी आयोगाने १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ७७० ग्रामपंचायतींसाठी प्रभागरचना कार्यक्रम राबवून तो अंतिम केला होता.मात्र,आता पुन्हा २०२४ आणि २०२५ मधील १०० ग्रामपंचायतीचा समावेश करून एकूण ८७० ग्राम पंचायतींसाठी नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम निर्णय घेण्यात आला.यानुसार १२ जून रोजी विशेष ग्रामसभा घेण्यात येणार असून, १९ जूनला ग्रामपंचायतनिहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध केली जाणार आहेत.या प्रारूपावर २५ जूनपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात येईल. या प्राप्त हरकतीवर प्रांताधिकारी सुनावणी घेणार असून त्यानंतर जिल्हाधिकारी ८ जुलैपर्यंत अंतिम अधिसूचनेस मान्यता देतील. त्यानंतर १० जुलै रोजी अंतिम आरक्षण जाहीर करण्यात येणार आहेत.

दरम्यान,नव्या आरक्षण प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात पुन्हा समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहे.यात इच्छुक उमेदवारांसह स्थानिक गटातटानी या आधीच तयारीला सुरुवात केली आहे.

### श्रीरामपूर तालुक्यातील मुदत संपलेल्या ह्या ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत जाहीर

बेलापूर बु, बेलापूर खुर्द, भेर्डापूर, एकलहरे, घुमनदेव, ब्राम्हणगाव वेताळ, गळनिंब, गोंडेगाव, गोवर्धनपूर, कारेगाव, खानापूर, वळदगाव, वडाळा महादेव, हरेगाव, भामठाण, खोकर, कुरणपूर, लाडगाव, महांकाळवाडगाव, मांलुजे, मांडवे, मातापूर,मातुलठाण, मुठेवाडगाव,नायगाव, निपाणीवाडगाव,पढेगाव, सराला,टाकळीभान या २९ ग्रामपंचायतीचा समावेश आहेत.

### तालुकानिहाय ग्रामपंचायतीचा समावेश

अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, श्रीरामपूर २९, राहाता २५, राहुरी ४४, नेवासा ५९, नगर ६०, पारनेर ८८, पाथर्डी ७९, शेवगाव ४८, कर्जत ५५, जामखेड ४९, श्रीगोंदा ६२ अशा एकूण ८७० ग्रामपंचायतींचा यामध्ये समावेश आहे.




# महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट; पारनेरच्या डॉक्टरला फासले काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : सोशल मीडियावर महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नायक कांशीरामजी यांच्याबद्दल अपमानकारक व आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील डॉ. मंगेश बेकारसे याच्याविरोधात संपूर्ण तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या विकृत मानसिकतेचा निषेध करत संतापलेल्या भीमसैनिकांनी संबंधित डॉक्टरच्या तोंडाला शाई फासून, त्याला चपलांचा हार



घालत चांगलाच धडा शिकवला. या घटनेमुळे तालुक्यात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित डॉक्टरवर तातडीने अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

याबाबत नागरिकांच्या चर्चेतून समजलेली माहिती अशी की, भाळवणी येथील डॉक्टर डॉ. मंगेश बेकारसे याने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कांशीरामजी यांच्याविषयी आक्षेपार्ह पोस्ट शेअर केली होती. ही पोस्ट सोशल मीडियावर (पान ४ वर)

# विधानपरिषद जागावाटपात 'मविआ'मध्ये काँग्रेस मोठा भाऊ!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : राज्यात आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधान परिषदेच्या जागावाटपा संदर्भात महाविकास आघाडीचा फॉर्म्युला अखेर जवळपास निश्चित झाला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याबाबतची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार, विधानपरिषदेच्या एकूण १७ जागांपैकी आठ जागा काँग्रेस लढवणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सहा तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागा मिळाल्या आहेत.

१ जून २०२६ हा उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी मिळून सर्व जागांवर पूर्ण ताकदीने लढणार आहे.

जागावाटपाची माहिती देताना मविआचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी सत्ताधारी भाजप आणि महायुतीवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, सध्या राज्यात भाजपचे 'पैसा फेक तमाशा देख' सुरू आहे. ५ लाख रुपये अॅडव्हान्स देऊन नगरसेवक पळवले जात आहेत. देवेंद्र फडणवीस (पान ४ वर)

**काँग्रेस – एकूण ८ जागा**
चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव, नागपूर (पोटनिवडणूक).

**उबाठा शिवसेना : एकूण ६ जागा**
रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, नाशिक.

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट : एकूण ३ जागा**
पुणे, ठाणे, सांगली-सातारा

# सत्तेसाठी नव्हे तर शेतकऱ्यांसाठी संघर्ष : मा. मंत्री शंकरराव गडाख

### सोनईतील शेतकरी मेळाव्यास हजारो शेतकरी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई येथे शुक्रवार दि. २९ मे २०२६ रोजी माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या उपस्थितीत भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास तालुक्यातील विविध गावांमधून हजारो शेतकरी, सभासद, कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या मेळाव्यात मुळा सहकारी साखर कारखान्याच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुळा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नानासाहेब तुवर यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी मुळा सहकारी साखर कारखाना हा शेतकऱ्यांची कामधेनू असल्याचे सांगितले. माजी खासदार यशवंतराव गडाख आणि माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी ही संस्था तळहाताच्या फोडाप्रमाणे



जपली व वाढवली असल्याचे त्यांनी नमूद केले. सर्वसामान्य शेतकरी केंद्रस्थानी ठेवून कारखान्याने काम केले असून, मुळा एज्युकेशन सोसायटी व कारखान्यामुळे नेवासा तालुक्याच्या विकासाला गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

सहकारी साखर कारखानदारी अनेक अडचणींना सामोरी जात असताना विरोधकांनी केवळ राजकारणासाठी चांगल्या चाललेल्या संस्थांमध्ये अडथळे निर्माण करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, माझ्यासारख्या शेतकरी कुटुंबातील व्यक्तीला सलग ११ वर्षे कारखान्याचे चेअरमन म्हणून काम करण्याची संधी गडाख कुटुंबाने दिली, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी आगामी निवडणूक न लढवण्याची घोषणा केली.मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शन करताना माजी मंत्री शंकरराव गडाख म्हणाले की, माजी खासदार यशवंतराव गडाख यांनी उभी केलेली कामधेनू सर्वांच्या सहकार्याने समर्थपणे चालवत असल्याचा अभिमान आहे. मुळा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊस बेणे, खते, पाइपलाइनसाठी आगाऊ मदत, बंधारे निर्मिती, ट्रॅक्टर खरेदी तसेच ऊस हार्वेस्टर मशीनसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यामुळे (पान ४ वर)

# दहावे उपोषण सरकारसाठी अंतिम इशारा..?



महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात मराठा आरक्षण आंदोलनाने गेल्या काही वर्षांत एक वेगळे आणि अस्वस्थ वास्तव निर्माण केले आहे. ३० मेपासून अंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हे त्यांचे दहावे उपोषण. एखाद्या आंदोलनकर्त्याने वारंवार उपोषण करणे, सरकारने वारंवार आश्वासने देणे आणि समाजाने पुन्हा नव्याने रस्त्यावर उतरावे लागणे, ही लोकशाही व्यवस्थेसाठी निश्चितच अभिमानाची बाब नाही. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाने मराठा आरक्षणाचा प्रश्न केवळ राजकीय मुद्दा राहिलेला नाही, तर तो सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. मराठा समाजातील बेरोजगारी, शिक्षणातील स्पर्धा, शेतीतील आर्थिक अस्थिरता आणि सरकारी नोकऱ्यांमधील घटती संधी यामुळे समाजात निर्माण झालेली अस्वस्थता या आंदोलनामागे आहे. त्यामुळे जरांगे यांच्या प्रत्येक उपोषणाला समाजाचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

भारतामध्ये आरक्षण ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर उभी आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजांना ऐतिहासिक अन्यायातून बाहेर काढण्यासाठी संविधानाने आरक्षणाची तरतूद केली. मंडल आयोगानंतर ओबीसी आरक्षण अधिक बळकट झाले. परंतु, गेल्या दोन दशकांत आर्थिक आणि सामाजिक बदलांमुळे अनेक इतर समाजघटकही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे येऊ लागले. महाराष्ट्रात मराठा, धनगर, मुस्लिम, लिंगायत, कुणबी यांसारख्या विविध समाजांनी स्वतंत्र आरक्षणासाठी संघर्ष केला. यामुळे आरक्षणाचा प्रश्न केवळ सामाजिक न राहता तो राजकीय समीकरणांचा केंद्रबिंदू बनला.




मराठा समाज हा राज्याच्या राजकारणात प्रभावी मानला जात असला, तरी समाजातील मोठा वर्ग आर्थिकदृष्ट्या मागे राहिलेला आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील युवक शिक्षण घेऊनही नोकरीपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे आरक्षण हा अधिकार अशी भावना समाजात दृढ झाली आहे. दुसरीकडे, ओबीसी समाजातही मराठा आरक्षणामुळे त्यांच्या विद्यमान आरक्षणावर परिणाम होईल, अशी भीती आहे. त्यामुळे या प्रश्नाने समाजात संघर्षाची रेषा अधिक गडद केली आहे.

याच कारणामुळे सरकारसमोरचा हा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. एकीकडे मराठा समाजाची तीव्र अपेक्षा, तर दुसरीकडे ओबीसी समाजाची असुरक्षितता ˉ या दोन्ही टोकांमध्ये सरकार अडकलेले दिसते. न्यायालयीन मर्यादा, ५० टक्के आरक्षणाची सीमा, घटनात्मक अडचणी आणि राजकीय दबाव यामुळे राज्य सरकारचे निर्णय वारंवार अडखळताना दिसले. परिणामी, आश्वासनांचे ढीग वाढले; पण कायमस्वरूपी तोडगा मात्र निघाला नाही.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची विशेष बाब म्हणजे त्यांनी आरक्षणाचा प्रश्न गावागावात पोहोचवला. अंतरवाली सराटीसारख्या छोट्या गावातून सुरू झालेल्या आंदोलनाने राज्यातील राजकारण हादरवले. मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, अधिकारी यांना वारंवार आंदोलनस्थळी जावे लागले. हे आंदोलन केवळ आरक्षणापुरते मर्यादित राहिले नाही; तर ते सरकारवरील अविश्वासाचे प्रतीक बनले आहे. दहा वेळा उपोषणाची वेळ येणे म्हणजे प्रशासन आणि राजकीय नेतृत्व या दोघांचेही अपयश मानावे लागेल.

आज जरांगे पाटील दहा प्रमुख मागण्यांसाठी पुन्हा उपोषणाला बसत आहेत. कुणबी प्रमाणपत्र, गुन्हे मागे घेणे, बलिदान देणाऱ्या कुटुंबीयांना नोकरी, सारथीच्या योजना, स्वतंत्र मंत्रालय अशा मागण्यांमध्ये केवळ राजकीय भावना नाही, तर सामाजिक असंतोषाची छाया आहे. त्यामुळे हे आंदोलन केवळ एका समाजाचे आंदोलन म्हणून पाहणे धोकादायक ठरेल.

यावेळी परिस्थिती अधिक गंभीर आहे. मे महिन्याच्या प्रखर उन्हात उघड्यावर सुरू होणारे आमरण उपोषण राज्य सरकारसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. जर आंदोलन चिघळले, तर त्याचे परिणाम केवळ सामाजिक नाही, तर राजकीयदृष्ट्याही दूरगामी असतील. राज्यात आधीच बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, उद्योगातील मंदी आणि वाढती सामाजिक दरी यामुळे अस्वस्थता आहे. अशा वेळी आरक्षणाचा प्रश्न अधिक संवेदनशील बनतो.

सरकारने आता वेळकाढूपणाची भूमिका सोडून स्पष्ट आणि कायदेशीरदृष्ट्या टिकणारा मार्ग स्वीकारण्याची गरज आहे. समाजाला आश्वासनांपेक्षा ठोस निर्णय हवे आहेत. तसेच, ओबीसी आणि मराठा समाजात संघर्ष निर्माण होणार नाही, याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संवाद, पारदर्शकता आणि घटनात्मक चौकटीत कायमस्वरूपी तोडगा काढण्याची हीच वेळ आहे.

कारण, एखाद्या आंदोलनकर्त्याचे दहावे उपोषण ही केवळ बातमी नसते; ती राज्यकर्त्यांच्या अपयशाची गंभीर नोंद असते.

# हनुमंतगाव ग्रामसभेत संतापाचा स्फोट

## रेशन गायब, घरकुल रखडले; ग्रामस्थांचा प्रशासनाला सवाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथे शुक्रवारी पार पडलेली ग्रामसभा प्रश्नांच्या भडिमाराने अक्षरशः धुमसली. रेशन वितरणातील अनियमितता, घरकुल योजनेतील अडथळे, गावातील मूलभूत सुविधांचा अभाव आणि आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवर संतप्त ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरत जोरदार जाब विचारला. अखेर अधिकाऱ्यांनी आश्वासनांची सरबत्ती केल्यानंतर वातावरण निवळले. एक मे रोजी कोरमअभावी तहकूब झालेली ग्रामसभा अखेर २९ मे रोजी पार पडली. ग्रामसेवक भालेराव यांनी रेशन संदर्भातील तक्रार अर्ज वाचून दाखवताच सभागृहात एकच खळबळ उडाली. गावकऱ्यांचे रेशन नेमके जाते कुठे? असा थेट सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.रेशन वेळेवर मिळत नसल्याने नागरिक त्रस्त असल्याचे सांगत ग्रामस्थांनी संबंधित यंत्रणेवर निष्काळजीपणाचा आरोप केला. यावेळी सोसायटीचे चेअरमन तात्यासाहेब घोलप आणि सचिव भालेराव यांनी रेशन वितरणातील अडचणी तातडीने दूर करण्याचे आश्वासन दिले. मात्र पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला. ग्रामसभेत घरकुल योजनेचाही मुद्दा चांगलाच गाजला. भाऊसाहेब आव्हाड यांनी गावातील अनेक गरजू कुटुंबांकडे स्वतःची जागा नसल्याने त्यांना घरकुलाचा लाभ मिळत नसल्याची वस्तुस्थिती मांडली. गरिबांना घरकुल द्यायचे, पण जागाच नाही; मग योजना नेमकी कोणासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित करत शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली.

अनिल घोलप यांनी गावातील पारावर नागरिकांना बसण्यासाठी ब्लॉक बसविण्याची मागणी केली. गावातील मूलभूत सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. दरम्यान, हनुमंतगाव उपकेंद्राचे डॉ. पंडोरे यांनी ग्रामस्थांना स्वच्छता, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, महिलांचे आरोग्य आणि लसीकरणाबाबत मार्गदर्शन केले. गावातील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी ग्रामसभेत आरोग्य समिती स्थापन करण्यात आली. या निर्णयाचे ग्रामस्थांनी स्वागत केले. या ग्रामसभेस सर्कल अधिकारी ठाकरे, तलाठी इनामदार, ग्रामसेवक भालेराव, प्रवरा कारखान्याचे संचालक अशोक घोलप, उपसरपंच प्राजक्ता अनाप, तात्यासाहेब घोलप, भागवत ब्राम्हणे, गोरक्षनाथ ब्राम्हणे, बाळासाहेब दिघे, भानुदास पर्वत, बाळासाहेब अनाप, सोमनाथ जेजुरकर, रूबीना शेख, दिपक घोलप, सुभाष ब्राम्हणे, दौलत ब्राम्हणे, शब्बीर शेख, शरद बनसोडे, संजय अनाप, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, सोसायटी संचालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भरडधान्य खरेदीतील मक्याची थकीत रक्कम

# शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

महाराष्ट्र शासनाच्या भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या मक्याच्या थकीत रकमेबाबत आमदार विवेक कोल्हे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रलंबित रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. सन २०२५-२६ मध्ये राज्य सहकारी पणन महासंघामार्फत भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांकडून हमीभावाने मका खरेदी करण्यात आला होता. मात्र ८ मार्च ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत खरेदी झालेल्या मक्याची देयके शेतकऱ्यांना मिळाली नव्हती. त्यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर बी-बियाणे, खते व शेतीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करताना अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. या गंभीर बाबीची दखल घेत आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा करत थकीत रक्कम तत्काळ वितरित करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणनमंत्री जयकुमार रावल यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागाला शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याबद्दल आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री, पणनमंत्री तसेच शासनाचे आभार मानले असून, पुढील काळातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

# आळेफाटा येथे कांद्याच्या हमीभावासाठी निलाव बंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा,:** आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला हमीभाव मिळावा या मागणीसाठी आज शेतकरी संघटनांनी व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कांद्याचे निलाव बंद आंदोलन केले. कांद्याला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.या आंदोलनावेळी जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे, संचालक माऊली खंडागळे, सुरज वाजगे तसेच शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी बोलताना देवदत्त निकम यांनी इशारा देत सांगितले की, शेतकऱ्यांच्या कांद्याला लवकरात लवकर हमीभाव जाहीर करून खरेदी सुरू केली नाही, तर येत्या २ तारखेला मंचर येथील नंदी चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. आंदोलनामुळे काही काळ बाजार समितीतील व्यवहार ठप्प झाले होते. शेतकऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत कांद्याला योग्य दर मिळावा, अशी मागणी केली.



# भाताचे ६१ हजार हेक्टरवर लागवडीचे नियोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : जिल्ह्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून अनेक भागांत पूर्वमोसमी पावसाच्या सरी कोसळत असून, आगामी काळात समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामातील पेरण्या वेळेत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने चालू वर्षासाठी जिल्ह्यात ६१ हजार १२० हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन केले असून, त्यानुसार विविध भात बियाण्यांचे वाटप सुरू करण्यात आले आहे.

पुणे जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात सुमारे २ लाख २ हजार हेक्टरवर पेरण्या होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भोर, वेल्हा, मावळ, मुळशी तसेच उत्तरेकडील खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांत प्रामुख्याने भात पिकाची लागवड केली जाते. तर पूर्व भागातील शिरूर, दौंड, पुरंदर, बारामती आणि इंदापूर तालुक्यांत सोयाबीन, तूर, मूग आणि उडीद या पिकांना प्राधान्य दिले जाते.

यंदा पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली असली, तरी शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या तयारीला सुरुवात केली आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या बियाणे, खते व इतर निविष्ठांचा पुरवठा कृषी विभागामार्फत कृषी सेवा केंद्रांकडे सुरू करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना जवळच्या केंद्रांवर नाममात्र दरात निविष्ठा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

> पूर्वमोसमी पावसामुळे खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. जिल्ह्यात भात लागवडीसाठी आवश्यक बियाणे व निविष्ठांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला असून, शेतकऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने पेरण्या कराव्यात. यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठीही कृषी विभागाकडून विशेष प्रशिक्षण दिले जात आहे.
>
> **संजय काचोळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, पुणे**
>
> ------------------

पुणे जिल्ह्यातील सात ते आठ तालुके भात उत्पादनासाठी ओळखले जातात. या भागातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह भात शेतीवर अवलंबून आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यातील भात पट्ट्यात सरासरी ५९ हजार ६२७ हेक्टर क्षेत्रापैकी ५९ हजार १३१ हेक्टरवर भाताची पुनर्लागवड झाली होती. याच पार्श्वभूमीवर यंदाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर भात लागवडीचे नियोजन केले आहे.

सध्या जिल्ह्यात मशागतीची कामे अंतिम टप्प्यात असून, पश्चिम पट्ट्यातील तालुक्यांत भात रोपवाटिकेची कामे सुरू झाली आहेत. काही ठिकाणी रोपवाटिकेत भात बियाणे टाकण्यासही सुरुवात झाली आहे. दरम्यान, मजुरांची टंचाई लक्षात घेता भात लागवडीत यांत्रिकीकरणाचा वापर वाढविण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. आत्मा व कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणाद्वारे भात लागवड तसेच रोपवाटिका व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जात आहे. पूर्व भागातही मशागतीची कामे वेगाने सुरू असून, पाणी उपलब्ध असलेल्या भागांत ऊस लागवडीच्या पूर्वतयारीलाही वेग आला आहे.

**भाताच्या विविध वाणांना पसंती :**

यंदाही आंबेमोहोर, साळ, दोडकी, कोलम आणि इंद्रायणी या पारंपरिक भात वाणांच्या लागवडीचे नियोजन शेतकऱ्यांनी केले आहे. त्याचबरोबर कोकणी, पार्वती, फुले समृद्धी, बासमती, रूपाली, रत्ना, साईराम, सोनम, सुरूची, वैष्णवी आणि तृप्ती या विकसित व संकरित वाणांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. पश्चिमेकडील डोंगरी भागात पावसाचे प्रमाण अधिक असल्याने आंबेमोहोर, साळ, कोलम आणि इंद्रायणी या वाणांची लागवड मोठ्या प्रमाणावर होणार आहे. मावळ, भोर आणि मुळशी तालुक्यांत पारंपरिक चारसूत्री, अभिनव पट्टा पद्धत, एसआरटी तसेच इतर पारंपरिक पद्धतीने भात लागवड केली जाणार असल्याची माहिती चांदखेड येथील भात उत्पादक शेतकरी नितीन गायकवाड यांनी दिली.

**दृष्टीक्षेपात**

भाताचे सरासरी क्षेत्र : ५९,६२७ हेक्टर गेल्या वर्षीची भात पेरणी : ५९,१३१ हेक्टर यंदाचे नियोजित भात क्षेत्र : ६१,१२० हेक्टर

# शिरसगाव न्यू इंग्लिश स्कूलच्या आकाश शिरसाटची मुंबई पोलीस दलात निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : शिरसगाव येथील खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आकाश शिरसाट याची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.ग्रामीण भागातील सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातून आलेल्या आकाश शिरसाट याने कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतानाच त्याने शाळेत स्पोर्ट्स टिचर म्हणून नोकरीही केली. शिक्षण आणि नोकरी यांचा समतोल साधत त्याने आपले ध्येय गाठले. आकाशच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक राजन वधवाणी यांनी त्याच्या घरी जाऊन पालकांसमवेत त्याचा सत्कार केला. तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास कोणतेही ध्येय साध्य करता येते. परिस्थिती शिक्षणाच्या आड येत नाही, हे आकाश शिरसाट याने आपल्या यशातून सिद्ध करून दाखविल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# युद्धजन्य परिस्थितीतून राहुरीची तेजस्विनी खैरे सुखरूप घरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : इराण व अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीत जहाजावर कार्यरत असलेली राहुरी ची तरुणी तेजस्विनी अक्षय खैरे गेल्या तीन महिन्या पासून युद्ध संकटात अडकलेली होती. युद्धजन्य परिस्थिती, समुद्रातील वाढलेला तणाव आणि सततची भीती यामुळे खैरे कुटुंबीयांमध्ये तेजस्विनी बाबत काळजी वाटत होती.२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका व इस्राइलने इराणवर केलेल्या संयुक्त लष्करी हल्ल्यामुळे इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्ला अली खामेनी मारले गेले. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने अमेरिकन तळावर हल्ले करत महत्त्वाच्या होर्मुझची समुद्रधुनी हा व्यापारी जलमार्ग ठेवला. सी एम ए, सी जी एम मॅनअस ही फ्रान्सच्या सी एम ए, सी जी एम या आंतरराष्ट्रीय कंपनीची मालवाहू कंटेनरशिप आहे. जी भारताच्या ध्वजाखाली प्रवास करते. २८ फेब्रुवारीच्या माहितीनुसार हे जहाज संयुक्त अरब आमीरातीच्या खली का बंदरातून निघून अमेरिकेतील ऑरेंज या बंदराच्या दिशेने प्रवास करत होते. अवघ्या काही मिनिटांचा प्रवास बाकी असताना अमेरिका व इराण युद्धामुळे जलमार्ग रोखून ठेवले गेले. जहाजावरील युद्धाच्या काळात होर्मुझच्या समुद्रधुनीत अडकल्यामुळे भीषण अनुभव सांगताना अंगावर शहारे येत होते. सातत्याने क्षेपणास्त्र हल्ले तसेच ड्रोन हल्ल्याचा धोका वाटत होता. ज्यामुळे जहाजावरील लाईट बंद ठेऊन तसेच टॅकर बंद करून जीव वाचवण्याचा प्रयत्न केला जात होता. इराणी क्षेपणास्त्रांचा जहाजावरील हल्ला डोळ्या समोर घडतानाचा थरारक अनुभव होता. डोळ्यासमोर युद्धाची धग, मनात सतत भिती अशा परिस्थितीत तेजस्विनी खैरे हिने धैर्य ठेवल्याने तीला सुखरुप घरी आणले. सर्वांच्या प्रार्थना व तीच्या धैर्यामुळे मायदेशी सुखरुप पाऊल ठेवल्यानंतर खैरे कुटुंबीय व मित्र आप्तेष्टांकडून प्रचंड आनंद व समाधान व्यक्त केले.



# बारामती एमआयडीसी परिसरात ५७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सुरक्षा व्यवस्था

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : नागरिकांच्या सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी बारामती ग्रामीण पोलीस स्टेशन आणि विविध कंपन्यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती एमआयडीसी परिसर, तांदुळवाडी बौद्ध विहार आणि काटेवाडी येथे ५७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या संकल्पनेतून सुमारे ८ लाख ७० हजार रुपयांच्या खर्चातून हा उपक्रम राबविण्यात आला असून परिसरात आता सीसीटीव्हीची करडी नजर राहणार आहे.या सीसीटीव्ही प्रणालीच्या शुभारंभ कार्यक्रमास एमआयडीसी विभागीय कार्यकारी अधिकारी हनुमंतराव पाटील, बारामती ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, बारामती कॅटल फीडचे अभिजित शिंदे, काटेवाडीचे उपसरपंच श्रीधर घुले, तांदुळवाडीचे दिगंबर बेलदार, काटेवाडीचे पोलीस पाटील, कृष्णा ताटे, बिडा बारामतीचे अध्यक्ष धनंजय जामदार, उद्योजक, पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.बारामती एमआयडीसीमधील कॅमेऱ्यांसाठी बारामती कॅटल फीडचे अभिजित शिंदे आणि कृष्णा ताटे यांनी सहकार्य केले. तांदुळवाडी बौद्ध विहारातील कॅमेऱ्यांसाठी दिगंबर बेलदार यांनी तर काटेवाडी येथील कॅमेऱ्यांसाठी उपसरपंच श्रीधर घुले यांनी मदत केली. सीसीटीव्ही उभारणीसाठी योगदान देणाऱ्यांचा पोलीस प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्था सक्षम करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संशयित हालचालींवर लक्ष ठेवणे, गुन्ह्यांची उकल वेगाने करणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारणे तसेच अपघात आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविणे शक्य होणार असल्याचे नमूद करण्यात आले.

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी बारामती एमआयडीसी परिसरातील प्रमुख चौक, औद्योगिक क्षेत्र, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील भागांमध्ये टप्प्याटप्प्याने आणखी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची माहिती दिली. या उपक्रमासाठी विविध कंपन्या आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला असून पोलीस प्रशासन आणि उद्योग क्षेत्रातील समन्वयाचे हे उत्तम उदाहरण असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

सीसीटीव्ही प्रणालीमुळे गुन्हेगारांवर वचक निर्माण होईल तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होईल. सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी केले.

# वैभव गायकवाडची 'बँक ऑफ बडोदा'मध्ये निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी |** संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथील वैभव गंगाधर गायकवाड यांनी आपल्या जिद्द आणि अथक मेहनतीच्या जोरावर 'बँक ऑफ बडोदा'मध्ये 'बँक अधिकारी' पदावर धडक मारत गावाची मान उंचावली आहे. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल आश्वीसह परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वैभव गायकवाड यांचे प्राथमिक शिक्षण आश्वी खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी नेवासे येथे, त्यानंतर आश्वी खुर्द येथे उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. आपल्या यशाबद्दल बोलताना वैभव गायकवाड भावूक झाले. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय दिवंगत वडील गंगाधर नामदेव गायकवाड यांना आणि आपल्या कुटुंबाला दिले आहे. दरम्यान, जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, सौ. शालिनिताई विखे पाटील यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवरासह ग्रामस्थांनी गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे.

# नागरिकांना मिळणार हक्काचे सातबारा उतारे : नगराध्यक्ष पराग संधान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील निवासी अतिक्रमणे नियमित करून संबंधित नागरिकांना हक्काचे सातबारा उतारे देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली. पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत नगरपरिषदेकडे सादर करावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

कोपरगाव शहरातील हनुमान नगर, इंदिरानगर, दत्तनगर, महादेव नगर, गजानन नगर, गांधीनगर, टिळक नगर, संजय नगर, सुभाष नगर, लक्ष्मी नगर, साईनगर, येवला रोड, खडकी, जिजामाता उद्यान तसेच दत्त पार टाकळी नाक्यामागील बेट भागातील निवासी अतिक्रमणे शासनाच्या नियमानुसार नियमित करण्यात येणार आहेत.

नगरपरिषदेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अतिक्रमित जागा नियमित करून लाभार्थ्यांच्या नावावर सातबारा देण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला होता. यानंतर शिर्डीचे प्रांताधिकारी माणिकराव आहेर यांच्या



अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली.

महसूल विभागाने काढलेल्या सुधारित अध्यादेशानुसार १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन धोरणानुसार शहरातील सुमारे पाच हजार मालमत्ता पात्र ठरण्याची शक्यता आहे.

या प्रक्रियेसाठी ६ जून २०२६ पासून छापील अर्ज उपलब्ध होणार असून मालमत्ता कर नोंदवही, अतिक्रमण सर्वेक्षण नोंद, २०११ मधील वीज बिल, उपग्रह छायाचित्र तसेच मागील तीन वर्षांच्या मालमत्ता कर पावत्या आदी कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे.

# टाकळीभानमध्ये 'स्वर्णिम भारत रथाचे' स्वागत सुख-शांतीचा दिला संदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** :-प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने सुख, शांती, आणि सहजराजयोगाचा संदेश देणाऱ्या 'स्वर्णिम भारत रथा'चे टाकळीभान येथे आगमन झाले. श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नानासाहेब पवार यांच्या हस्ते रथाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी श्रीरामपूरच्या संचालिका ब्रह्माकुमारी मंदादिदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर उद्योगपती अश्पाक शेख यांनी ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या जागतिक शांततेच्या कार्याचे कौतुक केले, व आपल्याला जगण्यासाठी उत्तम विचारांचा मार्ग यांकडे असल्याचे सांगितले, मानवी जीवनातील भय, चिंता, रोग आणि तणावमुक्तीसाठी सेवाकेंद्राला भेट देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, मौलाना अहमद शेख, पो. हे. कुमार बैसाने, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, मधुकर कोकणे, अविनाश लोखंडे, काकासाहेब डिके ,विष्णुपंत पटारे, आप्पासाहेब रणनवरे, गोरख खुर्द, मधुकर गायकवाड, बाबा सय्यद, ब्रहमाकुमार शिके भाईजी, रखी भाईजी, कोकाटे भाईजी, रामनाथ भाईजी, गोयल भाईजी व सर्व ब्रहमाकुमार कुमारी, भाऊ-बहिणी व सेवाधारी उपस्थितीतयांच्यासह सर्व ब्रह्माकुमार-कुमारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## महाराष्ट्र शासन मोडी अभ्यासक नामिकेवर भारत पडवळ यांची निवड



**झरेकाठी** : महाराष्ट्र शासन भाषा विभागांतर्गत मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर करण्यासाठी मोडी अभ्यासकांची नामिका स्थापन करणे कामी शासन स्तरावर विचाराधीन होती शासनाकडे कोट्यावधी कागदपत्र वाचना अभावी मोडी कागद पडुन आहेत. उपलब्ध असलेले मोडी तज्ञ वाचकांची व लिप्यंतर कारांची प्रशासकीय, महसुल, शैक्षणिक,अभियांत्रिकी,ईत्यादी मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर किंवा इंग्रजीत भाषांतर करण्या करीता आवश्यक्ता असल्याने मोडी वाचन लिखाण करणारांची लेखी व तोंडी परिक्षा घेण्यात आली या परिक्षेत ३० मोडी अभ्यासक उत्तीर्ण झाले.

या मोडी अभ्यासकांची महाराष्ट्र शासन भाषा संचालनालय विभागांतर्गत नामिका स्थापन करण्यात आली आहे. या शासन स्तरावरील नामिकेवर संगमनेर तालुक्यातील सुकेवाडीतील भारत पडवळ यांची निवड झाली आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## प्रवरा पॉलिटेक्निकमध्ये ऑनलाइन प्रवेश सुविधा केंद्र सुरु

**प्रवरानगर** : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाल्यानंतर लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पॉलिटेक्निकमध्ये अत्याधुनिक ऑनलाइन प्रवेश सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी यांनी दिली.

जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून हे केंद्र उभारण्यात आले आहे. येथे ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी, शाखा निवड, करिअर मार्गदर्शन तसेच शिष्यवृत्ती योजनांची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र विशेष लाभदायी ठरणार असून, तज्ज्ञांकडून वैयक्तिक समुपदेशनही केले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह सुविधा केंद्राला भेट देऊन प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चांगदेवनगर येथील महादेव मंदिराचे काम अंतिम टप्प्यात

**पुणतांबा** : परिसरातील चांगदेव नगर येथील मारुती मंदिरांच्या पूर्व बाजूला असलेल्या महादेव मंदिराचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे चांगदेव कारखाना सुरु असतांना १९६ ३च्या दरम्यानचांगदेव नगर येथे मारूती मंदिर होते. त्यानंतर काही वर्षांनी ग्रामस्थांना त्याच्या लगतच महादेव मंदिर बांधले होते. येथील भाविकांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने महादेव मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे ठरविले आता जुन्या मंदिराच्या जागेवर मंदिराचे काम सुरू करण्यात आले आहे. नवीन मंदिराचा ११ फूटावर स्लॅब असून स्लॅब पासून १७ फूटावर कळस आहे.

सध्या कळसापर्यंत विट काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. काम पूर्ण झाल्यावर अंदाजे दीड लाख रुपये खर्च करून मंदिरात महादेवाची पिंड बसविण्यात येणार आहे. परिसरातील भाविक व देणगीदारांच्या सहकार्याने मंदिराचे काम सुरू असून भाविकांनी मंदिर पूर्ण होईपर्यंत असेच सहकार्य करावे असे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

# देवगड येथे श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सवाची भक्तिमय सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथे राष्ट्रसंत गुरुवर्य यांच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेल्या श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सव व श्रीमद् भागवत कथा सोहळ्याची गुरुवारी स्वामी यांच्या काल्याच्या कीर्तनाने व दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. या सोहळ्यास लाखो भाविकांनी उपस्थिती लावली होती. ज्ञानसागर सभामंडपात झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलताना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की, साधू-संतांचे जीवन हे जगाच्या कल्याणासाठी तसेच धर्म आणि राष्ट्राच्या हितासाठी समर्पित असते. संतांच्या तपश्चर्येमुळे आणि शिकवणीमुळे भारतीय संस्कृती जगात श्रेष्ठ ठरली आहे. देवगड भूमीही समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या तपश्चर्येमुळे पावन झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.

अधिक मासानिमित्त गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांनी सर्व जीवांच्या कल्याणासाठी श्रीमद भागवत कथेचे आयोजन केल्याचे सांगत, या पर्वकाळात कथा श्रवण केल्याने भाविकांना पुण्याचा ठेवा लाभल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांनी तब्बल १४ वर्षांनंतर येथे श्रीमद भागवत कथा सादर केली. विठ्ठल माझा माझा... तसेच डगमग डोळे माझे पाण्यावरी नाव गं... या भक्तिगीतांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. राधा ही भक्तीचे तर कृष्ण हे ज्ञानाचे प्रतीक असल्याचा संदेशही त्यांनी कथेद्वारे दिला.



### काल्याच्या कीर्तनाला भाविकांची विक्रमी गर्दी

अधिक मासानिमित्त गुरुवारी झालेल्या काल्याच्या कीर्तनाला भाविकांची विक्रमी गर्दी झाली. ज्ञानसागर सभामंडप महिला व पुरुष भाविकांनी फुलून गेला होता. जागा अपुरी पडल्याने अनेक भाविक मंदिर परिसरातील झाडाखाली बसून कीर्तन ऐकत होते. कथा समाप्तीनंतर दर्शनासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली. देवगड मंदिर परिसर व प्रवरा नदीकाठील प्रसादालय भाविकांनी गजबजून गेले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी गुरुवर्य भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते प्रसाद पूजन करण्यात आले. तसेच अन्नदान करणाऱ्या दात्यांचा श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते देवगड महाद्वारावर उभारण्यात आलेली काल्याची दहीहंडी फोडून महोत्सवाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत कैलासगिरी महाराज, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, नारायण महाराज ससे, दिनकर महाराज मते, आमदार , संत तुकाराम महाराज संस्थानचे महंत अंकुश महाराज जगताप यांच्यासह वारकरी संप्रदायातील संत मंडळी व हजारो भाविक उपस्थित होते.

सोहळा यशस्वी करण्यासाठी सेवेकऱ्यांनी तन, मन आणि धनाने सेवा दिल्याबद्दल स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी सर्वांचे आभार मानले.

# बदलत्या परिस्थितीत पौष्टिक तृणधान्यांना अनन्यसाधारण महत्त्व : डॉ. प्रशांत बोडके

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : बदलत्या परिस्थितीत पौष्टिक तृणधान्ये हे रोग कीड प्रतिकारक तसेच कमी पाण्यात येणारे आहे. पौस्टिक तृणधान्य आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असल्याकारणाने या पिकांच्या लागवडीस भरपूर वाव असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या पौष्टिक तृणधान्य प्रकल्पांतर्गत शिवार फेरी व नाचणी पीक प्रात्यक्षिके या कार्यक्रमाचे आयोजन श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील प्रगतीशील शेतकरी श्री. सलीम आत्तार यांच्या विद्यापीठनिर्मित फुले कासारी वाणाच्या नाचणी पिकाच्या प्रात्यक्षिक प्लॉटवर करण्यात आले होते. यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक आणि कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, प्रभारी तालुका कृषि अधिकारी प्रमीला जंजिरे, जिल्ह्याचे महाबीजचे व्यवस्थापक सुनील दौंड, शेतकरी संघटक राहुल पोळ, कोल्हापूर येथील अखिल भारतीय समन्वयित नाचणी व पौष्टिक तृणधान्य संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. योगेश बन, डॉ. सुनील अडांगळे, प्रा. अन्सार आत्तार उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले की नागलीसारख्या पौष्टिक तृणधान्यामध्ये प्रक्रिया करण्यास भरपूर वाव असून यामुळे शेतकर्यांना प्रक्रियाद्वारे अधिक अर्थाजन मिळू शकते. संतुलित खत वापर या अभियानांतर्गत त्यांनी जैविक खते तसेच हिरवळीच्या खतांचे महत्त्व विशद केले. येत्या खरीप हंगामात पिकांचे योग्य नियोजन करून हा हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ.पंडित खर्डे यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती देऊन त्याची उद्दिष्टे सांगितली. ते म्हणाले की या प्रकल्पांतर्गत कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यात पाचशेपेक्षा जास्त पौष्टिक तृणधान्यांची पीक प्रात्यक्षिके या खरीप हंगामात घेण्यात येतील आणि या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल. यावेळी डॉ. योगेश बन यांनी नाचणी व पौष्टिक तृणधान्य पिकांचे महत्त्व व लागवड तंत्रज्ञान याबद्दल शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली.

# धानोरेत गौण खनिजाची खुलेआम लूट !

## जलजीवन मिशनच्या तळ्यातील दगड-डबर काळ्या बाजारात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील धानोरे येथे जलजीवन मिशन अंतर्गत खोदण्यात आलेल्या तळ्यातून निघालेल्या गौण खनिजाच्या मोठ्या गैरव्यवहाराचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, शासनाच्या मालकीचे दगड व डबर काही ठेकेदारांकडून महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या कथित संगनमताने खासगी मालमत्ता दाखवून विक्रीस काढण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाच्या विकासासाठी उपयोगी पडणारी नैसर्गिक संपत्ती अक्षरशः ट्रॅक्टर आणि हायवा भरून बाहेर पाठवली जात असल्याने धानोरे परिसरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, धानोरे येथील जलजीवन मिशनच्या तळ्यातून मोठ्या प्रमाणात काळा दगड व डबर बाहेर पडले होते. सुरुवातीला हे गौण खनिज साठवण्यासाठी ठेकेदाराने तळ्याशेजारी असणाऱ्या शेतकऱ्याची खाजगी शेतजमिनीची भाडेतत्त्वावर व्यवस्था केली होती. त्यानंतर निधीअभावी जलजीवन मिशनचे काम रखडले आणि संबंधित ठेकेदाराने काम बंद करताना सदर गौण खनिज महसूल विभागाच्या ताब्यात दिल्याची माहिती समोर आली. मात्र, यानंतरच कथित गैरव्यवहाराला सुरुवात झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शासनाच्या ताब्यातील गौण खनिजाला खाजगी मालमत्ता असल्याचे दाखवत राहुरी तहसील कार्यालयातून अल्प मुदतीचा परवाना मंजूर करण्यात आला.

त्यासाठी अत्यल्प रॉयल्टी भरून हजारो ब्रास दगड व डबराची मोठ्या प्रमाणावर वाहतूक करण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. विशेष म्हणजे, गावातील अनेक वाड्या-वस्त्यांकडे जाणारे रस्ते जड वाहनांच्या सततच्या रहदारीमुळे अक्षरशः उखडून गेले आहेत. काही शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात जाणेही कठीण झाले असून धुळीचे साम्राज्य आणि अवजड वाहनांचा त्रास नागरिकांच्या जीवावर उठला आहे. भविष्यात गावातील रस्ते, बंधारे आणि विकासकामांसाठी हेच डबर व दगड उपयोगी पडू शकतील, या हेतूने ग्रामसभेत ठराव घेऊन तहसीलदारांकडे लेखी हरकतही नोंदवण्यात आली होती.

संबंधित गौण खनिज गावाच्या गरजेसाठी राखून ठेवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. दरम्यान, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना उत्खनन व वाहतुकीवर देखरेख ठेवण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या होत्या. बेकायदेशीर उत्खनन होणार नाही तसेच गौण खनिज चोरीला जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेशही देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात मंजूर परवान्यापेक्षा अधिक प्रमाणात दगड व डबर बाहेर नेण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावाची नैसर्गिक संपत्ती काही जण अक्षरशः लुटत आहेत.

महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणे शक्यच नाही, असा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अवैधरीत्या विक्री झालेल्या गौण खनिजाची चौकशी करून शासनाची फसवणूक उघड करावी, अशी जोरदार मागणी आता धानोरे ग्रामस्थांकडून होत आहे.

# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

## अ भा ग्राहक पंचायतीचे २ जूनला आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गणोरे** : वस्तूंवरील एमआरपी (कमाल विक्री किंमत) संकल्पनेच्या नावाखाली ग्राहकांचे आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने येत्या २ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततेत आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी, शहराध्यक्ष प्रकाश रासकर, जिल्हा सहसचिव सिताराम बोरुडे, शहर उपाध्यक्ष विनोद पेंटा, ग्राहक प्रबोधन प्रमुख हरिभाऊ चौधरी व शहर सचिव अजय काथेड आदी उपस्थित होते. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ग्राहक पंचायतीने म्हटले आहे की, ग्राहकांना अवाजवी किंमत आकारली जाऊ नये म्हणून एमआरपी व्यवस्था लागू करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक उत्पादित कंपन्यांकडून याच व्यवस्थेचा गैरवापर करून ग्राहकांची आर्थिक लूट केली जात आहे.

त्यामुळे बाजारपेठेत पारदर्शकता आणण्यासाठी आंदोलन उभारण्यात येत आहे. संघटनेने सरकारकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक उत्पादनावर उत्पादन खर्च छापणे सक्तीचे करणे, प्रथम विक्री किंमत स्पष्ट नमूद करणे, औषधे व जीवनावश्यक वस्तूंवर नफ्याची मर्यादा निश्चित करणे, एमआरपीसाठी स्वतंत्र कायदा करणे आणि गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याचा समावेश आहे.

११ मे रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदने देण्यात आली असून खासदारांनाही संसदेत हा विषय मांडण्याची मागणी करण्यात आली आहे. ही चळवळ व्यापारी किंवा उत्पादकांविरोधात नसून ग्राहकांच्या हक्कांसाठी आहे. समाजातील सर्व घटकांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन ग्राहक पंचायतीने केले आहे.

# 'खुपसे साहेब आम्हाला परत द्या!'

## श्रीरामपूरच्या बी.एल.ओं.ची एकमुखी मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : निवडणूक प्रक्रियेचा मुख्य कणा मानल्या जाणाऱ्या बी.एल.ओं. चे मार्गदर्शक व श्रीरामपूर तहसील कार्यालयातील निवडणूक महसूल सहाय्यक ओम खुपसे यांची शिर्डी येथे बदली झाल्याने श्रीरामपूर तालुक्यातील बी.एल.ओ. वर्तुळात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर बदली तातडीने रद्द करून खुपसे यांची श्रीरामपूर येथेच पुनर्नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी बी.एल.ओ. समन्वय समितीच्या वतीने तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सध्या निवडणूक आयोगामार्फत 'एस.आय. आर.' हा महत्त्वपूर्ण व तांत्रिकदृष्ट्या क्लिष्ट कार्यक्रम सुरू असून, २००२ च्या मतदार यादीची २०२४ च्या यादीशी पडताळणी, तसेच फॉर्म ६, ७ व ८ संबंधित अर्ज निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. या सर्व कामात ओम खुपसे यांच्या अनुभवपूर्ण मार्गदर्शनामुळे श्रीरामपूर मतदारसंघात मॅपिंगचे तब्बल ८६ टक्के काम पूर्ण झाले असून जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळाला आहे. अशा निर्णायक टप्प्यावर अनुभवी अधिकाऱ्याची बदली झाल्याने संपूर्ण कामकाज विस्कळीत होण्याची भीती बी.एल. ओंनी व्यक्त केली आहे.

बी.एल.ओंनी दिलेल्या निवेदनात खुपसे हे केवळ अधिकारी नसून निवडणूक प्रक्रियेत कार्यरत कर्मचाऱ्यांचे आधारस्तंभ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन त्यांची पुनर्नियुक्ती करावी, अन्यथा निवडणूक कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.


## सायटेशन नोटीस

प्रो.की. जमा.रु.
पान.नं.दि. / /२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात
चौ.अ.नं. /२०२६

**अर्जदार - श्री. शिवाजी रामरतन विघ्ने रा. मंगरुळ बु.**
**सामनेवाला - सरकार**

सदर अर्जदार हा मौजे मंगरुळ बु. येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. शिवाजी रामरतन विघ्ने रा. मंगरुळ बु. ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांचा स्वतःचा जन्म ०१.०६.१९६६ रोजी मंगरुळ बु., ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेधगाय अभिलेखपाल येथे जन्म/मृत्यू चा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म / मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचा स्वतःचा नोंदणी प्रमाणपत्र (जन्म/मृत्यू दिनांक नोंदणी दाखला) मिळू शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचा स्वतःचा शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचा स्वतःचा जन्म मृत्यू नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रामपंचायत कार्यालय यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवून तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने नगरपरिषद (ग्रामपंचायत कार्यालय येथे जावून जन्म/ मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्यूची नोद नसलेबाबत दि. १०.१२.२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आला आहे. जन्म/मृत्युच्या १ वर्षाच्या आतमध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीतीमध्ये सदर अर्जदार यांची स्वतःची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत /०५/२०२६ पूर्वी त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.आज दि. २५/०५/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

**हुकुमावरून**
**सही**
**तहसिलदार, शेवगाव**


# पुरुषोत्तम मासात चणेगाव भक्तिरसात दंग

## अखंड हरिनाम सप्ताहाने पंचक्रोशी भारावली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथे पुरुषोत्तम मासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात आणि अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाला. समस्त ग्रामस्थांच्या एकजुटीतून पार पडलेल्या या सप्ताहाने केवळ अध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक प्रबोधनाचीही प्रभावी छाप पंचक्रोशीवर उमटवली. हरिनामाच्या अखंड गजराने गाव दुमदुमून गेले असून, ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देणारा हा सप्ताह ग्रामसंस्कृतीचा आदर्श सोहळा ठरला.

पहाटेच्या काकडा भजनाने दिवसाची सुरुवात होत होती, तर रात्री उशिरापर्यंत हरिकीर्तनांच्या माध्यमातून भक्तिरसाची अखंड धार वाहत होती. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, जाहीर कीर्तन, प्रवचने



आणि वारकरी संप्रदायाच्या विविध धार्मिक परंपरांनी चणेगावचे वातावरण भक्तिमय झाले होते.

गावातील प्रत्येक घर सजले होते. दारोदारी सडा, आकर्षक रांगोळ्या आणि पुष्पवृष्टीतून संत-महंतांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. सप्ताहाचा शुभारंभ उंबरेश्वर देवस्थानचे मठाधिपती ह.भ.प. दत्तगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते झाला.

जनार्दन स्वामी संस्थानचे रमेशगिरीजी महाराज यांच्या प्रभावी प्रवचनाने भाविकांना अध्यात्मिक प्रेरणा मिळाली. सप्ताहादरम्यान ग्रामस्वच्छता अभियान, पर्यावरण संरक्षण उपक्रम, कृषी जनजागृती मोहीम आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अध्यात्म आणि समाजप्रबोधन यांची सुंदर सांगड या सप्ताहातून अनुभवायला मिळाली. दररोज सायंकाळी होणाऱ्या हरिपाठात महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरला. वारकरी परंपरेतील संस्कार, सामूहिक भक्ती आणि गावकुसातील एकोप्याचे दर्शन या सप्ताहात घडले. सप्ताहात ह.भ.प. ऋषिकेश महाराज कुयटे, भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, चैतन्य महाराज राऊत, तुकाराम महाराज शास्त्री मुंडे, कृष्णाजी महाराज कमानकर, गोविंद महाराज गोरे आणि तुकाराम महाराज लाड यांच्या जाहीर हरिकीर्तनांनी वातावरण भारावून गेले.

मृदंगाचार्य सचिन महाराज, गायनाचार्य मच्छिंद्र महाराज, रवी महाराज तसेच आळंदी वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांना भाविकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सप्ताहाची सांगता सरला बेटाचे पीठाधीश्वर गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यानंतर हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. शोभायात्रेतील आकर्षक रथ, संबळ वाद्यांचा निनाद, महिला लेझीम पथक, वाजंत्री पथक आणि वारकरी दिंडी हे विशेष आकर्षण ठरले.

चणेगावसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी या सप्ताहात सहभागी होत भक्ती, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा अद्वितीय संगम अनुभवला. गावाच्या एकजुटीचे आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणारा हा सप्ताह परिसरासाठी प्रेरणादायी ठरला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मधील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. ओमकार सुनील रोहोकले, रा. भाळवणी, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांनी सदर शेतजमिन मिळकतीबाबत आमचे आशिलाबरोबर सौदा करुन सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल केले आहे. त्यानुसार, सदरची मिळकत निर्वेध्य, निजोखमी असल्याचा हवाला विद्यमान मालक यांनी आमचे पक्षकारास सर्व हक्कांसह दिलेला आहे. तसेच आमचे विरहीत इतर कोणाबरोबरही कोणताही व्यवहार केलेला नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. सदरची मिळकत आमचे पक्षकारांनी बैठक घेवुन बाजारभावाने योग्य किंमत ठरवुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तरी, या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालु असल्यास अथवा गहाणखत, दान, बक्षीस पत्र, अव्वल जप्ती बँक / पतसंस्था बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट, बेनामी अगर इतर कोणताही वाद असल्यास संबंधितांनी अस्सल कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. सदरचे व्यवहारास कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे व्यवहारास, खरेदीस कायदेशीररित्या कोणाचीही काहीही हरकत नाही असे कायद्यानुसार समजण्यात येवुन आमचे आशिल नमुद मिळकतींचे ठरविण्यात आलेला खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. या जाहिर नोटीसची मुदत संपलेनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत, त्यानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

- परिशिष्ट मिळकतीचे वर्णन -

जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. पारनेर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद, पारनेर ह्द्दीतील तालुका पारनेर पंचायत समितीचे कार्यक्षेत्रातील गाव व ग्रामपंचायत मौजे भाळवणी येथील हंगामी बागायत शेतजमीन मिळकतीचे वर्णन -

| गट नं. | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु.पै. | चतुः सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५३६ | ३ हेक्टर ८८ आर | ७.५५ | गट नं.५३५ व ५३४ | गट नं.५२५ | गट नं.५३३ व ५३७ | गट नं. ३६५ |

या पैकी खरेदी देणार यांचे मालकीचे गट नं.५३६ मधील खाते क्र.४५६४ मधील लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०हे.४० आर ही हंगामी बागायत शेतजमिन मिळकत सर्व हक्क व अधिकारांसह खरेदीखताचा विषय असे.

| गट नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. | चतुः सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५३६ | ० हेक्टर ४० आर | ००.८० | गट नं.५३६ पैकी सुनिल तुळशीराम रोहोकले व वंदना सुनिल रोहोकले यांचे क्षेत्र | भाळवणी दैठणे गुंजाळ रस्ता | गट नं.५३६ पैकी नामदेव नरहरी रोहोकले व अनिल रामदेव रोहोकले यांचे क्षेत्र | गट नं. ३६५ |

ही संपुर्ण शेतजमिन मिळकत व यामध्ये असलेले जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, दगड, माती, झाड, झुडुप, विहीर व तदंगभुत वस्तुंसह तसेच सदर मिळकतीमध्ये जाणे-येण्याचे रस्त्याचे व वहिवाटीचे इजमेंट व संपुर्ण मिळकतीमधील लिहुन देणार यांचे समसमान असलेला फ्रंट असे सर्व हक्कासहीत घेण्याच्या हक्कासह खाली काही एक राखुन न ठेविता.

दि. २९/०५/२०२६, अहमदनगर

**ॲड. योगेश आर. थोरात**
( एम.ए., एलएल.एम., एम.बी.ए., डी.टी.एल., डी एल एल ॲण्ड एल डब्लु, ए.डी.आर., सायबर लॉ.)
एनरोल नं. MAH/३१७८/२०१९
कार्यालय-२०८, करण कोर्ट बिल्डींग, जुने जिल्हा न्यायालयासमोर, दादा चौधरी शाळेजवळ, अहमदनगर
मो.नं.७५०७९३७६५७

## पान १ वरुन

### तालुक्यातीलशेती व ग्रामीण अर्थकारणाला मोठी चालना मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या पाच वर्षांपासून सहकारी साखर कारखानदारी मोठ्या संकटांचा सामना करत असली तरी काटकसरीने व चिकाटीने मुळा कारखाना सक्षमपणे सुरू ठेवला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपासाठी जावा यासाठी कारखान्याचे विस्तारीकरण करण्यात आले असून, इथेनॉल निर्मिती प्रकल्प व वीज निर्मिती प्रकल्प उभारून शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.माझा संघर्ष सत्तेसाठी नसून शेतकऱ्यांसाठी आहे, असे ठामपणे सांगत गडाख यांनी सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आपली वाटचाल कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला. सभासद, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे मुळा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक यशस्वी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी ॲड. सुभाष दरंदले, अशुबा सानप, योगेश होंडे, बाळासाहेब पाटील, नवनाथ पठाडे, बाबा घुले, मुकुंद भोगे, अरुण घावटे, जालिंदर येळवंडे, राजेंद्र टेमक आदींनी मनोगत व्यक्त करून गडाख यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दर्शविला. मेळाव्यास ह.भ.प. राम नाथ महाराज पवार, ह.भ.प. अवेराज महाराज, विश्वासराव गडाख, सुनीलराव गडाख, उदयन गडाख, नंदकुमार पाटील, रावसाहेब कांगुणे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामनाथ बडे यांनी केले. यावेळी वाढदिवसानिमित्त हजारो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांचा सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव केला. सोनई ता. नेवासा येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना माजी मंत्री शंकरराव गडाख व उपस्थित शेतकरी, कार्यकर्ते.

### महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट; पारनेरच्या डॉक्टरला फासले काळे

व्हायरल होताच पारनेर तालुक्यातील पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आणि भीमसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला. कोट्यवधी जनतेचे आराध्य दैवत असलेल्या महापुरुषांचा अशा प्रकारे अवमान केल्याने आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या. या विकृत कृत्याचा जाब विचारण्यासाठी आणि आपला निषेध नोंदवण्यासाठी आज (दि. २९) मोठ्या संख्येने भीमसैनिक भाळवणी येथे एकत्र आले. संतप्त कार्यकर्त्यांनी महापुरुषांचा अवमान करणाऱ्या डॉ. मंगेश बेकारसे याला गाठून थेट जाब विचारला. त्यानंतर कार्यकर्त्यांच्या संतापाचा उद्रेक होऊन त्यांनी संबंधित डॉक्टरच्या तोंडावर शाई फेकली आणि गळ्यात चपलांचा हार घालून त्याचा जाहीर निषेध करत चांगलाच चोप दिला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ झाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. महापुरुषांची विटंबना करणाऱ्या अशा विकृत प्रवृत्तीवर पोलिसांनी कडक कायदेशीर कारवाई करून तात्काळ अटक करावी, अशी आग्रही मागणी आता आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून व नागरिकांमधून केली जात आहे.

### विषारी दारूमुळे १६ जणांचा मृत्यू

(राजेंद्र) राठोड या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू झाला, तर त्यांचे वडील प्रकाश राठोड यांनी दृष्टी गमावली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन्ही भावांची लहान मुले असून कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. घरातील कर्ते पुरुष गेले, आता मुलांना कसं वाढवायचं? असा आक्रोश विजय राठोड यांच्या पत्नी सारिका आणि विजू राठोड यांच्या पत्नी संगीता यांनी व्यक्त केला. आता मुलांचं शिक्षण, घरखर्च कसा चालवायचा? असा सवाल करत त्यांनी प्रशासनाकडे आर्थिक मदतीची मागणी केली. दोघे भाऊ मेहनत करून संसाराचा गाडा ओढत होते. आपल्या मुलांचं भविष्य घडवण्यासाठी ते मुंबई सोडून फुगेवाडीत कामासाठी आले होते; मात्र एका क्षणात त्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली. दरम्यान, अकबर अजीम खान पठाण यांना बुधवारी रात्री तोंडातून फेस येऊ लागल्याने वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. तसेच राजेश राजपूत यांनाही अचानक प्रकृती बिघडल्याने रुग्णालयात आणण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. राजेश राजपूत हे बँक रिकव्हरीचे काम करत होते आणि त्यांच्या पश्चात दोन मुली आहेत. गुरुवारी रात्री आनंद निकाळजे आणि आनंद देसाई यांचाही मृत्यू झाला. सलग मृत्यूंमुळे परिसरात भीती आणि शोककळा पसरली आहे. हडपसर परिसरातील पांढरे मळा येथे विषारी दारूमुळे पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. संबंधितांनी परिसरातील बेकायदेशीर दारूच्या अड्ड्यावर दारू सेवन केल्यानंतर त्यांना पोटदुखी, मळमळ आणि प्रकृती बिघडल्याचा त्रास सुरू झाला होता. उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र सर्वांचा मृत्यू झाला. स्थानिक महिला सुनंदा साबळे यांनी ही माहिती दिली. या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. परिसरात अनेक दिवसांपासून बेकायदेशीर दारूविक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. पोलिसांकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ दिखाऊ कारवाई होत होती. काही दिवसांनी पुन्हा अड्डे सुरू होत होते, असा आरोप महिलांनी केला. काही पोलिसांकडून हप्ते घेतले जात असल्याचाही गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून युद्धपातळीवर तपास सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. पोलिसांनी निष्काळजीपणा केला असल्यास संबंधितांवरही कारवाई होईल.

### विधानपरिषद जागावाटपात 'म विआ'मध्ये काँग्रेस मोठा भाऊ

व्होट चोरीच्या माध्यमातून मुख्यमंत्री झाले, आता पैसा फेकून निवडणुका लढत आहेत. 'बाप बडा ना भैया, सबसे बडा रुपय्या' अशी त्यांची स्थिती झाली आहे, अशी टीका केलीय.

# एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे सोलापूरात औपचारिक उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** सोलापूरमध्ये अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा विकसित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत लक्ष्मीनारायण मंदिर शैक्षणिक संकुलात एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे (सीबीएसई शाळा) अधिकृतपणे उद्घाटन करण्यात आले. जून २०२६ पासून शाळेची सुरुवात नर्सरी ते इयत्ता ७ वी पर्यंत करण्यात येत असून टप्प्याटप्प्याने इयत्ता १२ वी पर्यंत विस्तार करण्याची योजना संस्थेकडून आखण्यात आली आहे.



या भव्य उद्घाटन सोहळ्याला प्रसिद्ध आर्थिक तज्ज्ञ आनंद राठी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती, ज्यांनी या विद्यालयाचे रीतसर उद्घाटन केले. हा कार्यक्रम किर्तिश्री काबरा फाउंडेशनचे मुख्य दाते आणि विश्वस्त श्रीगोपाल काबरा आणि किर्ति काबरा यांच्या आदरणीय उपस्थितीत पार पडला, ज्यांच्या पाठबळाने हा प्रकल्प प्रत्यक्षात उभारण्यात आला.

या सोहळ्याला माहेश्वरी विद्या प्रचारक मंडल (एमव्हीपीएम)चे अध्यक्ष, विश्वस्त आणि प्रमुख सदस्यांसह स्थानिक आमदार (एमएलए), खासदार (एमपी) आणि इतर प्रमुख कॉर्पोरेट दाते यांसारखे ज्येष्ठ मान्यवर उपस्थित होते. एमव्हीपीएमच्या या संकुलात अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

कम्युनिकेशन लॅब (एलएसआरडब्ल्यू स्किल्स, वक्तृत्व कौशल्य) सायन्स एक्सपिरियन्स सेंटर (विज्ञान अनुभव केंद्र) स्ट्रीम लॅब (एआय-एमएल, रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी, एआर/व्हीआर, इत्यादी) अॅस्ट्रॉनॉमी (खगोलशास्त्र) आणि इस्रो लॅब पॉडकास्ट रूम (कंटेंट मेकिंग, कम्युनिटी एंगेजमेंट आणि ब्रॉडकास्ट स्टुडिओ)

त्याधुनिक वर्गखोल्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, एनपीएव्ही क्रीडा मैदान, सभागृह आणि खुल्या छताचे नाट्यगृह (ओपन-एअर अॅम्फीथिएटर) किर्तिश्री काबरा फाउंडेशनमध्ये आमचा विश्वास आहे की, शिक्षणाची संधी आणि सन्मान हे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचा मूलभूत हक्क असावा. किर्तिश्री काबरा विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, दर्जेदार शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून दिले जाईल, ज्यामुळे त्यांना प्रगतीच्या नव्या संधी मिळतील. जवळपास ९७ वर्षांचा समृद्ध वारसा लाभलेल्या एमव्हीपीएम संस्थेच्या सहकार्याने हा प्रकल्प साकारताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. दर्जेदार शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्व विकासासाठी योगदान देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील,असे किर्ति काबरा म्हणाल्या.

१९२९ मध्ये स्थापन झालेली एमव्हीपीएम पुणे ही एक नामांकित शैक्षणिक आणि सामाजिक संस्था आहे, ज्याला विविध सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवरील घटकांमध्ये दर्जेदार शिक्षण, विद्यार्थी कल्याण आणि समुदाय विकासाला चालना देण्याचा ९७ वर्षांचा वारसा लाभला आहे. नवोपक्रम, प्रायोगिक शिक्षण आणि सर्वांगीण विकासावर विशेष भर देत, एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे उद्दिष्ट सोलापूर आणि आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी भविष्यवेधी शैक्षणिक वातावरण तयार करणे हे आहे. नवीन पिढीला भविष्यासाठी लागणारी कौशल्ये आणि चांगले संस्कार देऊन ही संस्था सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या देशाच्या प्रयत्नांमधील एक महत्त्वाचे पाऊल ठरली आहे.



# संप्रदायावर आघात करणाऱ्याला माफी नाही : ह.भ.प. संदीप महाराज जाधव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** अधिकमासाचे औचित्य साधून सुरक्षेत्र शिंगी (ता. गंगापूर) येथे आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताहात चौथ्या दिवसाचे कीर्तन ह.भ.प. संदीप महाराज जाधव यांच्या रसाळ व परखड वाणीने भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

कीर्तन सेवेत मार्गदर्शन करताना संदीप महाराज जाधव म्हणाले की, वारकरी संप्रदाय अनादी काळापासून चालत आलेला आहे. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज यांसारख्या संतांनी या संप्रदायाची जोपासना केली. त्यानंतर अनेक संतांनी आपले संपूर्ण आयुष्य संप्रदायाच्या सेवेसाठी अर्पण केले. त्यामुळे संप्रदायावर किंवा संत-महात्म्यांवर कोणी आघात करण्याचा प्रयत्न करीत असेल, तर संप्रदाय त्याला कधीही माफ करणार नाही.

ते पुढे म्हणाले की, अधिकमास हा दानधर्म, परमार्थ आणि भक्तीचा पर्वकाळ मानला जातो. या पवित्र काळाचे औचित्य साधून मौजे शिंगी येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. सगुरू श्री रामगिरीजी भक्त मंडळाच्या वतीने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता परमपूज्य महंत स्वामी श्री रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळी व तरुण कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### पुष्पावती पवार



**नेवासा :** नेवासा बु. येथील जुन्या पिढीतील पुष्पावती गुलाबराव पवार (वय ८८ वर्षे ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.


यांच्या मागे दोन मुले,सुना,पाच मुली, जावई,नातवंडे असा परिवार आहे.भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे डिस्टिलरी इंचार्ज महेंद्र पवार व नेवासा बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी नरेंद्र पवार यांच्या त्या मातोश्री होत.

### भाऊसाहेब काकडे



**पानेगांव :** नेवासा तालुक्यातील पानेगांव येथील टेलर नावाने परिचित असणारे प्रगतिशील शेतकरी भाऊसाहेब रामजी काकडे यांचे दि.२७ बुधवार रोजी अल्पशा निधन झाले (वय-५७) त्यांच्या पश्चात आई,पत्नी, भाऊ दोन मुले, एक मुलगी, पुतणे जावई ,नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते सुभाष व दिलीप यांचे जेष्ठ बंधू होत.

### शिवाजीराव जाधव



**टाकळीभान:** येथील एस टी महामंडळ मधील निवृत्त कर्मचारी शिवाजीराव भिमाजी जाधव वय (७२ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच अकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, दोन सुना, चार नातवंडे, दोन भाऊ, भाऊजाई असा मोठा परिवार आहे. गोरक्षनाथ व संभाजी जाधव यांचे ते बंधू तर जनरल स्टोअर व्यवसायिक किरण जाधव यांचे ते वडील होत.

# गोरखनाथ त्रिभुवन राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** ग्रामीण भागातील शिक्षणाचा बदलता प्रवाह आणि विद्यार्थ्यांमध्ये घडणारी सकारात्मक शैक्षणिक क्रांती याचे प्रेरणादायी उदाहरण ठरलेल्या जि. प. प्राथमिक शाळा चांडगावचे शिक्षक श्री. गोरखनाथ रंभाजी त्रिभुवन यांना शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय दिमाखदार सोहळ्यात 'आदर्श शिक्षक सेवासन्मान २०२६' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शिक्षक पॅनलच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात 'स्वराज्यरक्षक माँ जिजाऊ' फेम प्रसिद्ध अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

कुटुंबीयांच्या उपस्थितीत गौरव हा सन्मान स्वीकारताना गोरखनाथ सरांसोबत त्यांचे वडील रंभाजी त्रिभुवन, पत्नी सुरेखाताई त्रिभुवन, भाऊ दत्तू त्रि. पाटील, नीता त्रि. पाटील, रेणुका ताई त्रि. पाटील, राजू त्रि. पाटील, नवनाथ त्रि. पाटील, मुलगा रघुनंदन त्रि. पाटील, पार्थ पाटील तसेच गावकरी आबा सरोवर व रामसिंग महाजन सर उपस्थित होते. कुटुंबीय आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत सन्मान स्वीकारताना सरांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमान झळकत होता.

ग्रामीण शिक्षणात परिवर्तन घडवणारे कार्य अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गोरखनाथ सरांनी सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. नवोदय, शिष्यवृत्ती आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना मिळालेले यश, आधुनिक पद्धतीने दिलेले मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेली स्पर्धात्मक वृत्ती याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धतीमुळे शिक्षणाचा बदलता प्रवाह स्पष्टपणे दिसून येत असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. पुरस्कारात स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे व त्यांच्या टीमने या सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते.

हा पुरस्कार माझ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक सहकारी, चांडगावचे ग्रामस्थ तसेच माझ्या कुटुंबियांना समर्पित आहे. ˉ
गोरखनाथ त्रिभुवन
(आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त)

## चोरी करणाऱ्या दोघांवर लोणी पोलिसांत गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** वीज मीटरमध्ये छेडछाड करून वीज मीटर स्लो करून वीज चोरी करण्याच्या तब्बल दोन घटना उघडकीस आल्या. याप्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत प्रदीपकुमार दिनेश परदेशी, सहायक अभियंता, ४०० केव्ही उपकेंद्र बाभळेश्वर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपण तांत्रिक कर्मचाऱ्यांसमवेत वीज कनेक्शनची तपासणी करत असताना प्रमोद आण्णासाहेब म्हस्के यांच्या घराचे वीज कनेक्शन तपासणीसाठी गेलो. तेव्हा त्यांच्या मीटरची तपासणी केली असता सदर मीटर हे ७९ टक्क्यांनी हळू फिरत असल्याचे आढळले. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे मीटर सील तोडून मूळ संरचनेत छेडछाड करून २९२ युनिटची २३,१६०, रूपयांची वीज चोरी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सदरचे फिर्यादीवरून प्रमोद आण्णासाहेब म्हस्के,( रा.नगर-मनमाड रोड, ता.राहाता) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दुसरी घटना राहात्याजवळच येथे घडली असून प्रभाकर कोंडाजी राऊत यांच्या राहत्या घराचे कनेक्शन तपासणीसाठी सहायक अभियंता प्रदीपकुमार परदेशी हे कर्मचाऱ्यांसमवेत गेले असता त्यांना सदर मीटर हे सुमारे ६२ टक्क्यांनी हळू फिरत मीटरमध्ये छेडछाड करत असल्याचे आढळून आले. सदर जवळपास १५७७ युनिटची ३५,७७० रूपयांची वीज चोरी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सदर फिर्यादीवरून प्रभाकर कोंढाजी राऊत, (रा. नगर-मनमाड रोड, ता. राहाता ) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही प्रकरणाचा पुढील तपास लोणी पोलीस करीत आहेत.

# सतीश वाणी यांना उच्च न्यायालयाचा दिलासा सत्र न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** जिल्हा न्यायालयाचे जप्ती वॉरंट घरी बजवण्यासाठी गेलेल्या बेलीफ च्या हातातील वॉरंट फाडून तसेच शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणातील आरोपी सतीश भानुदास शिंदे राहणार पाटील गल्ली यांना वैजापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने सुनावलेल्या दोन वर्षे सक्त मजुरी व दहा हजार रुपये दंडाच्या शिक्षेला उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिली आहे. अर्जदार सतीश वाणी यांनी दाखल केलेल्या अपील अर्जाची अंतिम सुनावणी होईपर्यंत शिक्षेला स्थगिती देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याशिवाय सतीश वाणी यांची पंधरा हजार रुपयांच्या वैयक्तिक जामिनावर सुटका करावी असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश सिद्धेश्वर ठोंबरे यांनी २२ मे रोजी हा निकाल दिला. या निकालामुळे वाणी यांना दिलासा मिळाला आहे.

या घटनेची अधिक माहिती अशी की, ठिकाण येथील दिवाणी न्यायालयाचे मुख्य बेलिफ अनिल बिडवई जिल्हा न्यायालयाचे जप्ती वॉरंट घेऊन सतीश पाणी यांच्या घरी गेले असता त्यांनी हे वॉरंट फाडून शिवीगाळ करत सरकारी कामात अडथळा आणला होता. या प्रकरणी पोलिसात दाखल झालेल्या एफआयआर वरून सतीश वाणी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणी न्यायालयात झालेल्या सुनावणीनंतर न्यायाधीश एल.जी.पाछे यांनी १४ मेला सतीश वाणी यांना दोन वर्ष सक्त कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. या निकालाविरुद्ध वाणी यांनी शिक्षेला स्थगिती देण्याबाबत ॲड. रविंद्र गोरे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात अपील अर्ज दाखल केला. सतीश वाणी विरुद्ध राज्य सरकार या खटल्यात न्यायाधीश ठोंबरे यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून वरील प्रमाणे निकाल दिला.

## जनगणना जनजागृतीसाठी डॉ. अमोल बागुल ब्रँड अँबेसिडर



**अहिल्यानगर :** दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तसेच जगातील सर्वाधिक पारितोषिक विजेते कलाकार डॉ. अमोल बागुल यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत जनगणना ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड करण्यात आली आहे. जनगणनेविषयी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून जनगणना मोहिमेला व्यापक स्वरूप देण्यात आले आहे. आकाशवाणी व विविध रेडिओ चॅनेलवरील विशेष मुलाखती, जिंगल्सच्या माध्यमातून दररोज जनगणना आवाहन, एआय टूल्सच्या सहाय्याने इमेज, व्हिडिओ, पीडीएफ निर्मिती, तसेच वृत्तपत्रांमधून सातत्यपूर्ण जनजागृतीपर बातम्यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे.

याशिवाय माझा भारत माझी जनगणना या विशेष वेबपेजची निर्मिती, जनगणना टोल फ्री क्रमांक, विशेष हॅशटॅग, सोशल मीडिया प्रचार साहित्य, जनगणना विषयक गाणी, रिंगटोन व जिंगल्स तयार करण्यात आले आहेत. फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम, युट्युब तसेच बल्क मेसेज प्रणालीद्वारे व्यापक जनसंपर्क मोहिम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांना मुख्य जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्र. उपायुक्त शहाजान तडवी, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, जनगणना विभाग प्रमुख राकेश कोतकर तसेच सर्व प्रभाग अधिकारी, मास्टर ट्रेनर व पर्यवेक्षक यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## बांधकाम कामगारांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**वडाळा महादेव :** हरेगाव फाटा येथे बांधकाम कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील अनेक कामगारांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या उपक्रमासाठी मयूर गव्हाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांना उद्भवणाऱ्या आरोग्य समस्या लक्षात घेऊन तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ही तपासणी करण्यात आली. शिबिरातील लाभार्थी उषा राऊत, वैष्णवी देशमुख, सुरैय्या शेख. संभाजी मुठे, लताबाई मुठे, अनिता धनवटे. अनिता कुसळकर, दत्तात्रय कुसळकर. इस्माईल सय्यद, रेहबान शेख, देवयानी गायकवाड. हिना पटेल, सद्दाम शेख, सविता लगे. नुरजहा शेख, रुक्सार शेख, इरफाना सय्यद. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल फारूक भाई शेख वाजीद शेख यांनी सर्वांचे आभार मानले. कष्टकरी घटकांसाठी अशा स्वरूपाचे उपक्रम राबवणे काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या शिबिरामुळे बांधकाम कामगारांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .३० मे २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२७ ४६० ५५० | ०-४ | १४९ २४८ २२० | जोड ०७-३४--१८-२९-४५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १६९ २६८ ३३० | ६-९ | १८० २८९ ३६० | जोड ६१-२९-४३-७५-९८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ११९ | १-० | १३६ २३५ ३३४ | जोड १२-६०-४५-८९-०३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

द•ख•ल

## हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस

**अहिल्यानगर** : सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह (रहे.) उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस दरवर्षीप्रमाणे यावर्षी दि. ३ व ४ जून रोजी होत आहे. या कार्यक्रमासाठी संयोजक मंडळाकडून जय्यत तयारी सुरू असून, कोणत्याही भाविकाची गैरसोय होणार नाही, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. बुधवार दि. ३ जून रोजी संदल व गुरुवारी दि. ४ रोजी ऊरुस होत आहे. यानिमित्त ४ जूनला रात्री ९ वा. मशहूर कव्वाल हैदर नाजा व तौसिफ जुनैदी यांच्या सुश्राव्य कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. याच दिवशी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले असून याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे करण्यात आले आहे. कोळगाववाले बाबा यांच्या संदल व ऊरुस आणि कव्वाली व महाप्रसाद अशा सर्व धार्मिक कार्यक्रमांचा सर्वधर्मिय भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे सर्व विश्वस्त, मुजावर व ऊरुस समिती आणि कोळगाव गावकर्यांतर्फे करण्यात आले आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त भिंगारमध्ये वृक्षारोपण व स्वच्छता अभियान



**अहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक जागृतीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान तसेच सेवापूर्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा आणि सीए रवींद्र कटारिया यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग आणि क्रांतिकारक कार्याला अभिवादन केले. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ड. सुरेंद्र कटारिया आणि शामराव पांढरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याच कार्यक्रमात एसटी महामंडळातून सेवानिवृत्त झालेले शामराव माधवराव पांढरे यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, दिलीपराव ठोकळ मेजर, राजू जंगम, जहीर सय्यद, संजय ढोणे, सर्वेश सपकाळ, जालिंदर अळकुटे, दिलीपशेठ गुगळे, नवनाथ वेताळ, अभिजीत सपकाळ, सखाराम अळकुटे, भाऊसाहेब सावळे, कुमार धतुरे, योगेश चौधरी, उमाशंकर सिंह, दीपक अमृत, ताराचंद ठोकळ आदी उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते समाजप्रबोधन करणारे विचारवंत होते. त्यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान राबवून आम्ही समाजाला सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करत आहोत. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड आणि स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

## जेसीबीचे टायर पंक्चर काढण्याच्या वादातून मजुराला मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर** : जेसीबीच्या टायरचे पंक्चर काढताना ट्यूब टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका मजुराला आणि त्याच्या मुलाला लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना पोखर्डी येथे घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोखर्डी परिसरात नवनाथ आनंदा काळे हे मजुरीचे काम करतात. ते आरोपी कृष्णा परशुराम वारुळे याच्या जेसीबीच्या टायरचे पंक्चर काढत होते. त्यावेळी टायरमध्ये नवीन ट्यूब टाकावी लागेल, असे नवनाथ यांनी आरोपीला सांगितले. यावरून संतप्त झालेल्या कृष्णा याने 'तू मला आधी का सांगितले नाही' असे म्हणून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने आपल्या इतर साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यानंतर आरोपी परशुराम वारुळे याने नवनाथ यांना शिवीगाळ करत लोखंडी रॉडने त्यांच्या हातावर जोरदार प्रहार केला. दुसरीकडे, आरोपी सागर विश्वास देठे याने लाकडी दांडक्याने तर अनिल वाघुंडे याने नवनाथ व त्यांच्या मुलाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या चौघांनी मिळून बाप-लेकाला जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर नवनाथ काळे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी कृष्णा वारुळे, परशुराम वारुळे, सागर देठे आणि अनिल वाघुंडे यांच्याविरुद्ध मारहाण व धमकीचा गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## टेम्पोची दुचाकीला जोरदार धडक; व्यापारी गंभीर जखमी, कोतवाली पोलिसांत गुन्हा

**अहिल्यानगर** : शहरात वाहनांच्या अपघातांचे सत्र सुरूच असून, अहिल्यानगर ते पुणे रस्त्यावरील सोनेवाडी चौकात एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात पांढऱ्या रंगाच्या भरधाव टेम्पोने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एक दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. संतोष सुरजमल बोथरा (वय ४५ वर्षे, रा. ताराबाग कॉलनी, केडगाव, अहिल्यानगर) असे या अपघातात जखमी झालेल्या फिर्यादीचे नाव आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पांढऱ्या रंगाच्या चारचाकी टेम्पोच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संतोष बोथरा हे आपल्या दुचाकीवरून अहिल्यानगर-पुणे रस्त्याने शाहूनगरच्या दिशेने जात होते. ते सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास सोनेवाडी चौकाजवळ पोहोचले असता, पांढऱ्या रंगाच्या चारचाकी टेम्पोने (क्रमांक एमएच १६ डीपी ३३०५) रस्त्यावरील परिस्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपले वाहन अतिशय भरधाव वेगात चालवले. या बेजबाबदार चालकाने बोथरा यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे बोथरा हे दुचाकीवरून थेट रस्त्यावर खाली कोसळले. सदर अपघातामध्ये संतोष बोथरा यांच्या डोक्याला आणि डोळ्याला मोठा मुका मार लागला असून, डाव्या खांद्याला व डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच त्यांच्या दुचाकीचे बाजूचे कव्हर फुटून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अपघातानंतर जखमी बोथरा यांच्यावर रुग्णालयात औषधोपचार सुरू असल्यामुळे तक्रार देण्यास काहीसा विलंब झाला. उपचार पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला असून पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# टाकळी खातगाव शाळेची तोडफोड

### संस्थाचालक महिलेची पोलिसांकडे धाव : विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील टाकळी खातगाव येथील समता शैक्षणिक संस्थेच्या शाळेची न्यायालयीन वाद प्रलंबित असताना बेकायदेशीरपणे तोडफोड व जाळपोळ करण्यात आल्याचा गंभीर आरोप संस्थाचालक शकिरा रमजान शेख यांनी केला आहे. याप्रकरणी एमआयडीसी तसेच पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अद्याप गुन्हा नोंदविला नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

तक्रारदार शकिरा शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, टाकळी खातगाव येथील गट क्रमांक ३९/१ मधील सुमारे ३२ गुंठे जागेत मागील ११ वर्षांपासून समता शैक्षणिक संस्था कार्यरत आहे. या ठिकाणी १ ली ते १२ वीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात १०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था शिक्षणाचे केंद्र बनली आहे.

तक्रारीनुसार, दिनांक ११ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास संबंधित गैरतक्रारदारांनी नियोजनपूर्वक शाळेवर धाड टाकून पत्र्याचे शेड, बांधकाम व इतर साहित्याची तोडफोड केली. शाळेमध्ये कोणी नसताना ही कारवाई करण्यात आली. शेजारील व्यक्तीने माहिती दिल्यानंतर तक्रारदार घटनास्थळी पोहोचले असता संबंधित मंडळी शाळा पाडत असल्याचे दिसून आले. यावेळी संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ फुटेज तसेच जाळपोळीचे दृश्य



रेकॉर्ड करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

तसेच, शाळा व जागेवरून सुरू असलेला वाद न्यायालयात प्रलंबित असताना कोणत्याही न्यायालयीन आदेशाशिवाय जमाव जमवून जबरदस्तीने शाळेचे नुकसान करण्यात आले. विरोध करण्यासाठी गेलेल्या तक्रारदार महिला व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागा त्यांनी सन २०१५ मध्ये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे विकत घेतली होती. अहमदनगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक ३१८५/२०१५ व ३८५०/२०१५ अन्वये व्यवहार पूर्ण झाला होता. खरेदीखतानंतर जागेचा ताबाही देण्यात आला होता. त्यानंतर शाळेचे बांधकाम करून संस्था सुरू करण्यात आली. मात्र, नंतर जमीन व्यवहारावरून काही नातेवाईकांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता.

या प्रकरणात अहमदनगर येथील न्यायालयाने २०१९ मध्ये एकतर्फी आदेश दिल्यानंतर तक्रारदारांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले असून ते अद्याप प्रलंबित आहे. तसेच संबंधित जागेबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालयातही अपील सुरू असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी आरोप केला आहे की, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाही महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल करून फेरफार रद्द करण्याचे आदेश मिळविण्यात आले. त्यानंतर काही व्यक्तींनी संगनमत करून जागेवर अतिक्रमण करण्याचा व शाळा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. आम्ही पुन्हा येऊ आणि जागा मोकळी करून ताबा घेऊ, पोलिस व कायद्याला घाबरत नाही, अशी धमकी संबंधितांनी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे स्वतःच्या जीवितासह कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे शकिरा शेख यांनी म्हटले आहे.

## गावठी दारू अड्ड्यांवर पोलिसांचे छापे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैधरित्या सुरु असलेल्या गावठी दारू अड्ड्यांवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. नगर तालुक्यातील निमगाव घाणा आणि टाकळी खातगाव परिसरात सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर छापा टाकून पोलिसांनी सुमारे ८६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जागेवरच नष्ट केला असून, तीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



स.पो.नि. माणिक चौधरी यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार २८ मे रोजी एम आयडीसी पोलिसांच्या पथकाने निमगाव घाणा व टाकळी खातगाव येथे धाड टाकली, या कारवाईत पोलिसांनी रसायन मिश्रित गावठी दारू तयार करण्याचे साहित्य जप्त केले. यामध्ये निमगाव धाणा येथे आरोपी राजू सखाराम गव्हाणे (वय ४५) याच्या घराजवळील शेडमध्ये ५० नगर तालुक्यातील निमगाव घाणा आणि टाकळी खातगाव परिसरात गावठी दारू अड्ड्यांवर छापा टाकून कारवाई करताना एमआयडीसी पोलिसांचे पथक. हजार रुपये किमतीचे १००० लिटर कच्चे रसायन आणि २० हजार रुपयांची २०० लिटर तयार दारू पोलिसांनी नष्ट केली. टाकळी खातगाव येथे आरोपी राजेंद्र विलास पवार (वय २२) याच्या घराजवळील ओढ्यात ५ हजार रुपये किमतीचे १०० लिटर कच्चे रसायन व ४ हजार रुपयांची ४० लिटर दारू नष्ट केली, तसेच टाकळी खातगाव परिसरातील आरोपी विनोद दिलीप पवार (वय २२) याच्या ठिकाणाहून ४ हजार रुपयांचे ८० लिटर कचे रसायन व ३ हजार रुपयांची ३० लिटर दारू जप्त करून नष्ट करण्यात आली.

या तिन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत आहेत. ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपरं पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक विनोद परदेशी, पोलिस अंमलदार मुकुंद दुधाळ, किशोर जाधव, सचिन हरदास, अक्षय रोहोकले, सुरज देशमुख आणि उमेश शेरकर यांच्या पथकाने केली.

## 'आभा' कार्ड असूनही शिक्षक कॅशलेस उपचारांपासून वंचित

### शिक्षक सेनेचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : राज्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आभा कार्ड काढत असले तरी प्रत्यक्षात खासगी रुग्णालयांमध्ये त्यांना कॅशलेस उपचार सुविधा मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन पाठविले असून, या संदर्भात त्यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.



शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आभा कार्ड काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह असला तरी प्रत्यक्ष उपचाराच्या वेळी अनेक खासगी रुग्णालयांकडून शिक्षकांना कॅशलेस सुविधा नाकारली जात असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समाज घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असताना गंभीर आजार, अपघात किंवा वैद्यकीय संकटाच्या वेळी त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक शिक्षकांना लाखो रुपयांचा वैद्यकीय खर्च करावा लागत असून शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने ही योजना केवळ कागदोपत्री राहण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रसाद शिंदे यांनी शासनाकडे राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आयुष्यमान भारत योजनेत पूर्ण समावेश करण्याची मागणी केली आहे. तसेच सर्व खासगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार सुविधा बंधनकारक करण्यात यावी, आभा कार्डधारक शिक्षकांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि जिल्हास्तरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. यासोबतच, जोपर्यंत सर्वसमावेशक योजना पूर्णपणे कार्यान्वित होत नाही, तोपर्यंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिले स्वीकारण्यात यावीत, ही प्रमुख मागणीही प्रसाद शिंदे यांनी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे.

## बंदुकीचा धाक दाखवत तरुणावर जीवघेणा हल्ला

### नऊ जणांच्या टोळीविरुद्ध गुन्हा दाखल; आरोपी अद्याप फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : पाथर्डी तालुक्यातील शेवगाव रोड परिसरात एका तरुणाला बंदुकीने जीवे मारण्याची धमकी देत नऊ जणांच्या टोळीने कुऱ्हाडीचे दांडे, काठ्या व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. २५ मे) दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गंभीर स्वरूपाच्या या घटनेतील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.**

या हल्ल्यात तुषार चव्हाण हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी शुभांगी साईनाथ चव्हाण (वय २०, रा. शेवगाव रोड, पाथर्डी) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, शुभांगी चव्हाण या त्यांच्या आई व आजीसोबत राहतात. रविवारी दुपारी त्या शेवगाव रोडवरील हॉटेल मधुबनजवळ असलेल्या समर्थ किराणा दुकानातून किराणा घेऊन बाहेर आल्या असता, पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून काही जण तेथे आले. त्यामध्ये पप्पू लाल्या भोसले, गुंग्या लाल्या भोसले, विशाल हंबड्या काळे, गुड्डी हंबड्या काळे (सर्व रा. बाभळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर), तसेच प्रल्हाद गहिनीनाथ मुरकुटे (रा. आष्टी, जि. बीड) आणि इतर तीन ते चार अनोळखी इसमांचा समावेश होता.

आरोपींनी शुभांगी चव्हाण यांना जबरदस्तीने ओढून नेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या तुषार चव्हाण याच्यावर आरोपींनी कुऱ्हाडीच्या लाकडी दांडक्याने डोक्यात वार करून गंभीर जखमी केले. तसेच इतर आरोपींनी तुषार व शुभांगी यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यावेळी आरोपींनी बंदुकीचा धाक दाखवत जीव मारून टाकू अशी धमकी दिली. तसेच शुभांगी चव्हाण यांना तुला किडनॅप करून विकून टाकतो, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेनंतर जखमी तुषार चव्हाण यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पाथर्डी येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. मात्र, इतकी गंभीर घटना घडूनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने पाथर्डी तालुक्यात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी घरी शिवणकाम देणार : रूपाली करांडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी राही फाऊंडेशनच्या माध्यमातून शिवणकामचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. घरच्या घरी पाचशे महिलांना रोजगार देणार असल्याचे प्रतिपादन राही फाउंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे यांनी केले. महिला स्वयंरोजगार प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी राही फाउंडेशनच्या संचालिका करांडे बोलत होत्या. यावेळी जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष ड. महेश शिंदे, भाऊसाहेब पादीर, उडान संस्थेचे अध्यक्षा ड. आरती शिंदे, गौरी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा गीता टेमक, अंगणवाडी सेविका शोभा मोढवे, राही फाउंडेशनचे संचालक निलेश गर्जे आदी उपस्थित होते.

पुढे करांडे म्हणाल्या की, कौशल्य विषयक फक्त प्रशिक्षण घेऊन उपयोग नाही, तर त्या प्रशिक्षणाचा उपयोग भविष्यात स्वयंरोजगार सुरू करता आला पाहिजे. गरजू महिलांच्या हाताला काम पाहिजे म्हणूनच राही फाउंडेशनने हा प्रकल्प हाती घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. महेश शिंदे म्हणाले की, कौशल्य विकास प्रशिक्षणामधून स्वयंरोजगार ही काळाची गरज आहे. सध्याच्या महागाईच्या काळात बेरोजगारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यावर मात करून महिला सक्षम करण्यासाठी राही फाउंडेशन महिलांना प्रत्यक्ष घर बसल्या शिवणकाम देऊन स्वयंरोजगारीत करण्यासाठी हा प्रकल्प राबवित असल्याचे त्यांनी सांगितले.

# महामार्गावरील दिशादर्शक फलकांवरील जुनी नावे बदला

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : राज्य शासनाने अधिकृतपणे औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर तसेच अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर असे घोषित केले असतानाही महामार्गावरील व सार्वजनिक ठिकाणांवरील दिशादर्शक फलकांवर अद्याप जुनी नावेच कायम असल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्याचा आरोप करत, आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे अद्ययावत करून छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर अशी नोंद करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनाद्वारे शासन आदेशाचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असून नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार सर्व



शासकीय फलक, दिशादर्शक बोर्ड व सार्वजनिक ठिकाणांवर अधिकृत नवीन नावे वापरणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी अद्याप औरंगाबाद व अहमदनगर ही जुनी नावे कायम दिसून येत आहेत, ही गंभीर बाब आहे.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर, ओबीसी सेलचे अध्यक्ष दीपक खेडकर, कार्याध्यक्ष नितीन घोडके, शहर संघटक राजेश भालेराव, सूरज शिंदे, ऋषिकेश रासकर, संकेत कराड, गणेश भालसिंग, सक्षम जाधव, अभिजीत खरात, कृष्णा शेळके, ओंकार जाधव, सार्थक लोहार, शिवाजी शिंदे, निलेश रासकर, सनी टेकाडे, सार्थक तागड, आशिष भगत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसने स्पष्ट केले आहे की, जर आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे बदलण्यात आली नाहीत, तर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल. तसेच लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात येईल आणि संभाव्य परिस्थितीतील जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

M डागा | शांतीलाल डागा

दाळमंडई/मार्केट यार्ड, अ.नगर

७५८८११५१५७/९८२२०८१४४०

द•ख•ल


## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या डिझेल बचतीच्या अनुषंगाने उपाययोजना

**पुणे :** माहे मे २०२६ पासून पेट्रोल, डिझेल व सीएनजी इंधनामध्ये झालेल्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने आगार पातळीवर डिझेल बचतीसाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, विभागात १०५ इलेक्ट्रिक वाहने असून दैनंदिन ४६ हजार २३२ किलोमीटर चालनात येतात, त्यामुळे जवळपास १० हजार ९८१ लिटर डिझेलची दैनंदिन बचत होत आहे. येत्या काळात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर पूर्णक्षमतेने करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती विभाग नियत्रंक अरुण सिया यांनी दिली आहे. पुणे विभागातील आगारांना आगार पातळीवर उद्दिष्टे निश्चित करुन देण्यात आलेली आहे. प्रत्येक आगाराने मागील वर्षाच्या तुलनेत १ ने किलोमीटर प्रति १०लिटरमध्ये (केपीटीएल) वाढ करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. ज्या फेऱ्यांचे उत्पन्न कमी झालेले आहेत त्या फेऱ्या तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आल्या आहेत. विभाग किंवा आगार पातळीवर चालकांच्या केपीटीएलमध्ये वाढ होण्याकरीता त्यांना प्रबोधन करण्यात येत आहे तसेच वरिष्ठ पातळीवरुन मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती श्री. सिया यांनी दिली आहे.

## दिवे येथे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी विशेष सुविधा

**पुणे :** वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे कामकाज वेळेत पूर्ण होण्यासाठी वाहन चालक व मालकांच्या सोयीसाठी मौजे दिवे येथील कार्यालयात रविवार, ३१ मे २०२६ या शासकीय सुट्टीच्या दिवशीही योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाची सुविधा सुरू ठेवण्यात आली आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार २०० वाहनांसाठी कोटा उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाहन चालक व मालकांनी योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी आपली वाहने दिवे कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच स्कूल बस चालक व मालकांनी आपल्या वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करून घ्यावे. स्कूल बस वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## आळंदी-चऱ्होली डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ.ज्योत्स्ना आवारी बिनविरोध



**आळंदी :** आळंदी-चऱ्होली डॉक्टर्स असोसिएशनची नूतन कार्यकारिणी नुकतीच सर्वसंमतीने बिनविरोध निवडण्यात आली. अध्यक्षपदी डॉ.ज्योत्स्ना आवारी, सचिवपदी डॉ. सचिन सुदडे, उपाध्यक्षपदी डॉ. निखिल सोनवणे तर खजिनदारपदी डॉ. रवींद्र बदरखे यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी पदाधिकाऱ्यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून डॉक्टर्समधील समन्वय अधिक दृढ करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. डॉ. ज्योत्स्ना आवारी अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर म्हणाल्या, आळंदी-चऱ्होली परिसरातील सर्व डॉक्टरांचा विश्वास आणि सहकार्य हीच आमची खरी ताकद आहे. असोसिएशनच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रातील सहकार्य, संवाद आणि सेवाभाव अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी विविध आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर दिला जाईल. तसेच युवा डॉक्टरांना व्यासपीठ उपलब्ध करून देत सर्व सदस्यांना एकत्र घेऊन संघटनेची वाटचाल अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील.

# पुरंदरचे 'अंजिराचे गाव' आता डिजिटल आणि स्मार्ट गुरोळी पॅटर्नची तालुक्यात मोठी झेप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

''''**नाझरे सुपे :**''''अनिकेत नितीन काळे पिढ्यानपिढ्या दर्जेदार अंजिराच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या पुरंदरच्या पूर्व भागातील गुरोळी गावाने आता 'स्मार्ट आणि सुरक्षित गाव' म्हणून आपली नवी ओळख निर्माण केली आहे. राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री ग्रामसमृद्धी पंचायत राज अभियानात' या गावाने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. केवळ रस्ते आणि पाण्याचा विकास न करता आरोग्य, डिजिटल प्रशासन आणि महिला सक्षमीकरणाच्या जोरावर गावाने मिळवलेले हे यश इतर ग्रामपंचायतींसाठी दीपस्तंभ ठरणारे आहे. गुरोळी गावाने आपल्या नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. अभियानांतर्गत गावातील तब्बल १६३० नागरिकांचे 'आयुष्मान भारत' कार्ड काढून त्यांना हक्काचे आरोग्य कवच मिळवून देण्यात आले आहे.

प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच स्वतंत्र अधिकृत वेबसाईट सुरू करण्यात आली आहे.



श्रमदानातून यशाची गुढी... 'मुख्यमंत्री ग्रामसमृद्धी पंचायत राज अभियानात' पुरंदर तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावल्यानंतर गुरोळी (ता. पुरंदर) येथील तरुण-तरुणी, महिला आणि ग्रामस्थांनी हातात झाडू व कचऱ्याच्या पिशव्या घेऊन साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबवली. संपूर्ण गावाने एकजुटीने श्रमदान करत स्वच्छतेचा हा अनोखा पॅटर्न उभा केला आहे.

''आमच्या गावाने आरोग्य, डिजिटल सेवा आणि महिला सक्षमीकरणावर भर दिला आहे. गावातील महिला आणि तरुणांनी एकत्र येऊन घेतलेल्या कष्टाचे हे फळ आहे. आमचे गाव आता केवळ अंजिराचे गाव राहिले नसून ते पुरंदर तालुक्याचे 'स्मार्ट व्हिलेज' बनले आहे.'' - महिला प्रतिनिधी व ग्रामपंचायत प्रशासन, गुरोळी (पुरंदर)

ग्रामस्थांना आपल्या अडीअडचणी मांडण्यासाठी तक्रारपेटी बसवण्यात आली असून, संपूर्ण गाव सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणून सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात आली आहे. गावाच्या या यशात महिला शक्तीचा वाटा अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. गावातील महिलांना केवळ पारंपरिक बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. या माध्यमातून गावात 'शेतकरी स्वयंसहायता गट' स्थापन करण्यात आले आहेत. यामुळे गावातील महिला शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. गावाला शाश्वत विकासाकडे नेण्यासाठी विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून गावात सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच, शासकीय इमारतींवर 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' युनिट्स बसवून पावसाचे २ लाख लीटर पाणी थेट जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढवण्याचे कौतुकास्पद काम गावाने केले आहे.गावातील प्रत्येक मजुरापासून ते परदेशात राहणाऱ्या अनिवासी ग्रामस्थांनी दिलेल्या आर्थिक योगदानातून गावात सार्वजनिक वापरासाठी स्टीलची ताटे आणि ग्लास खरेदी करण्यात आले. यामुळे गावातील कार्यक्रमांमधून प्लास्टिकचा वापर शंभर टक्के बंद झाला आहे. तसेच, मनरेगा आणि ग्रामस्थांच्या थेट श्रमदानातून गावातील १२ किलोमीटर रस्त्यांवर १३ हजार झाडे लावली गेली, ज्यात दाट जंगलाची 'मियावाकी' पद्धत वापरण्यात आली आहे. कचरा व्यवस्थापनासाठी गावात ५ कंपोस्ट खत युनिट्स तयार करण्यात आले आहेत.

## पुणे जिल्ह्यात ३४ वितरकांचे परवाने निलंबित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** खरीप हंगाम २०२६ मध्ये निविष्ठांची गुणवत्ता राखण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरीय भरारी पथक स्थापन करण्यात आले असून पथकाच्यावतीने करण्यात आलेल्या तपासणीत ३४ वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील भेसळयुक्त खते, बियाणे व कीटकनाशके यांच्या विक्रीस आळा बसण्यास मदत होणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी कळविले आहे. गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकांनी जिल्ह्यामध्ये वितरकांच्या तपासण्या केल्या, तपासणी दरम्यान गंभीर अनियमियता आढळलेल्या वितरकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. कृषी सेवा केंद्र तपासणी वेळी विक्री परवान्यामध्ये साठा रजिस्टर मधील शिल्लक खत साठा व प्रत्यक्षात असलेला खत साठा ताळमेळ न जुळणे, विक्रीस ठेवण्यात आलेल्या कंपनीच्या उत्पादनाच्या स्रोतांचा परवान्यामध्ये समावेश नसणे, ज्यादा दराने विक्री करणे, नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत नूतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, शेतक-यांना पक्की बिले न देणे आदी कारणामुळे ३४ वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले असून यामध्ये खतांचे २६, किटकनाशके २ व बियाणांचे ६ परवान्यांचा समावेश आहे. तसेच आंबेगाव तालुक्यात ८, भोर -२, दोंड-९, इंदापुर-२, जुन्नर-९ आणि शिरुर – ४ याप्रमाणे परवाने निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती श्री. काचोळे यांनी दिली आहे.

## भारताची विमानवाहतूक हवामान क्षेत्रात मोठी झेप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारताने विमानवाहतूक हवामान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण झेप घेत जगातील सर्वात प्रगत देशांच्या यादीत स्थान मिळवले आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय (खऋख) विमानतळावर देशातील पहिल्या 'स्कायकास्ट' (डज्ञूउरीीं) प्रणालीचे उद्घाटन केले. अशा प्रकारची अत्याधुनिक रिअल-टाइम विमानवाहतूक हवामान माहिती प्रणाली असलेल्या जगातील केवळ १९ देशांमध्ये आता भारताचाही समावेश झाला आहे.पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या 'मिशन मौसम' अंतर्गत विकसित करण्यात आलेली ही प्रणाली विमानवाहतूक सुरक्षेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. रडार विंड प्रोफायलर्स, ऋथअड, डजूअठ, मायक्रोवेव्ह रेडिओमीटर आणि लिडार सीलोमीटर यांसारख्या अत्याधुनिक वातावरणीय तंत्रज्ञानांच्या मदतीने धुके, वाऱ्याचा वेग, हवेतील अस्थिरता (टर्ब्युलन्स) आणि दृश्यमानता यांचे रिअल-टाइम निरीक्षण या प्रणालीद्वारे केले जाणार आहे. त्यामुळे सुरक्षित लँडिंग, अधिक सक्षम टेक-ऑफ आणि हवामानामुळे होणारे उड्डाणातील व्यत्यय कमी होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाला पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन तसेच भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेचे (खखढच्) संचालक डॉ. ए. सूर्यचंद्र राव उपस्थित होते. आयआयटीएमने 'थळऋएद' या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाद्वारे या पुढील पिढीच्या प्रणालीच्या विकासात वैज्ञानिकदृष्ट्या मोलाची भूमिका बजावली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आधारित विमानवाहतूक निर्णय सहाय्य, अत्याधुनिक हवामान अंदाज आणि धुकेमुक्त विमानवाहतूक व्यवस्थेकडे भारताची वाटचाल या प्रणालीमुळे अधिक वेगाने होणार असल्याचे सांगण्यात आले. दिल्ली नंतर पुढील 'स्कायकास्ट' सुविधा जेवर विमानतळावर उभारण्यात येणार असून, पुढील काळात देशभरात या प्रणालीचा विस्तार करण्याचे नियोजन आहे.



## पुण्यात विषारी दारूचा कहर ४८ तासांत १५ जणांचा मृत्यू, योगेश वानखेडे अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे अवघ्या ४८ तासांत १५ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हडपसर, काळेपडळ, दापोडी आणि फुगेवाडी परिसरातील मृत्यूंमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून, अनेक जण विविध रुग्णालयांत उपचार घेत आहेत. त्यापैकी काहींची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, मृत व्यक्तींनी स्पिरीटयुक्त बनावट दारूचे सेवन केले होते. संबंधितांना सुरुवातीला चक्कर येणे, उलट्या होणे, तोंडाला फेस येणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे जाणवली. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान अनेकांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पोलिसांनी योगेश वानखेडे या सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. वानखेडे हा पुण्यातील मुंढवा परिसरातील रहिवासी असून, उरुळी कांचन आणि फुगेवाडी भागात बनावट दारू तयार केली जात असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. ही दारू हडपसर, काळेपडळ तसेच पिंपरी-चिंचवडमधील विविध भागांत विकली जात होती. पोलिसांनी आरोपीकडून बनावट दारूचे कॅन आणि संबंधित साहित्य जप्त केले असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे. स्पिरीट मिसळून तयार करण्यात आलेली ही दारूच मृत्यूमागील प्रमुख कारण असल्याचा संशय तपास यंत्रणांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, इतकी गंभीर घटना घडूनही पोलिसांकडून अधिकृत माहिती देण्यात विलंब होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. या घटनेनंतर पुणे शहरातील अवैध दारू विक्रीचे जाळे पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## नारायणगाव येथे भावी डॉक्टरांना सर्पदंश उपचाराचे धडे
### १५ दिवसांच्या समर इंटर्नशिपमध्ये राज्यभरातील ३० विद्यार्थी सहभागी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने विघ्नहर नर्सिंग होम व संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव (ता. जुन्नर) येथे समर इंटर्नशिप प्रोग्राम (एसआयपी) चे आयोजन करण्यात आले आहे. या १५ दिवसांच्या निवासी शिबिरात राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयातील ३० प्रशिक्षणार्थी भावी डॉक्टर सहभागी झाले आहेत. सर्पदंश व उपचार, विषबाधा, आपत्कालीन व्यवस्थापन, वैद्यकीय संशोधन व आरोग्य शिक्षण या विषयांवर त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.



सर्पदंश व विषबाधा उपचारतज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून काम पाहत आहेत. समन्वयक म्हणून स्नेहा मिश्रा जबाबदारी सांभाळत आहेत. डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत यांनी आदिवासी व दुर्गम ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीच्या वैद्यकीय सेवा पुरवून हजारो गंभीर रुग्णांना जीवनदान दिले आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा प्रशिक्षणार्थींना होणार आहे. डॉ. राऊत म्हणाले, ''महाराष्ट्रात एकूण १०५ एसआयपी केंद्र आहेत. त्यामध्ये विघ्नहर नर्सिंग होम हे एकमेव खासगी हॉस्पिटल आहे ज्याची भावी डॉक्टरांना प्रशिक्षण देण्यासाठी निवड झाली आहे. कुलगुरू निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला असून सध्या चौथ्या तुकडीचे प्रशिक्षण सुरू आहे.''

या शिबिरात लातूर, नागपूर, बीड, पुणे, नाशिक, इगतपुरी, संभाजीनगर, अहिल्यानगर, चंद्रपूर, बुलढाणा, जळगाव, संगमनेर, कोल्हापूर, सांगली, नांदेड, धुळे, वर्धा, उदगीर येथील वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. ज्योती पुसनाके, आयुष रामचंदनी, प्राची गाढे, सागर खोट, रोहित थोरवे, दिव्या भामरे, आम्रपाली लोखंडे, अर्चना दराडे यांच्यासह अन्य विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

## सांसद आदर्श गाव दापोडीत अवैध दारू विक्री जोमात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**केडगाव :** दौंड तालुक्यातील सांसद आदर्श गाव म्हणून दापोडी या गावाकडे पाहिले जाते, खासदार सुप्रिया सुळे यांनी दापोडी हे दत्तक गाव घेतले होते , त्यांनी त्या माध्यमातून गावात विकास कामे केली , परंतु अलिकडील काळात गावात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू झाली, सध्या गावात अवैध दारु विक्री करण्यासाठी चढाओढ सुरू झाली आहे, अनेकांनी अवैध दारु धंदे सुरू केले आहे, ते ही भर बाजार पेठेत, कोणतीच कारवाई होत नसल्याने व चिरीमिरीत विषय मिटत असल्याने दारु धंदे टाकण्याची स्पर्धा सुरू झाली आहे, या कडे पोलीस प्रशासन जाणुन बुजुन दुर्लक्ष करत आहे, तसेच ग्रामपंचायतीने अनेक वेळा पत्र व्यवहार करुन देखील कोणतीच कारवाई होत नसेल तर पोलीस प्रशासनावर शंका उपस्थित होत असल्याची चर्चा सध्या गावात सुरू आहे, या दारु पायी अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहे, काहीनी आपल्या जमीनी विकल्या आहेत, सांसद आदर्श गाव असताना दारु विकली जात आहे , संबंधित अवैध दारू विक्री कायमची बंद करण्यात यावे , आशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे, जर जर दारु बंद झाली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.




## स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर लवकरच सहाय्यता कक्ष : डॉ. नीलम गोऱ्हे
### स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने डॉ गोऱ्हे यांची घेतली भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत आज महेश बडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांची सिल्व्हर रॉक्स निवासस्थानी भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. शिष्टमंडळाने स्पर्धा परीक्षा वेळेत घेण्यात याव्यात, आयोग आणि विद्यार्थ्यांमध्ये नियमित संवाद व्हावा, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तात्काळ निर्णय घेऊन न्याय मिळावा, अशी मागणी केली. तसेच सारथी, बार्टी यांसारख्या शासनाच्या अखत्यारीतील संस्थांना मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर व्हावा आणि स्पर्धा परीक्षांसाठी नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांशी सातत्याने संवाद साधण्यासाठी आठवड्यातून एकदा स्वतंत्र कार्यालयात भेटीचे आयोजन करण्यात यावे, अशी विनंतीही शिष्टमंडळाने डॉ. गोऱ्हे यांच्याकडे केली. यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आयोगाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णयांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, याबाबत अभ्यास करून त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. तसेच स्पर्धा परीक्षा संदर्भातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेतर्फे पुण्यात सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, या कक्षामध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येईल. हा कक्ष विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच त्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी स्वमदत गटाच्या स्वरूपात कार्य करेल. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच, आयोगाचा कारभार ठरलेल्या वेळेनुसार पार पडावा, विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक निर्णय व्हावेत यासाठी लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. ज्या प्रश्नांवर धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, त्या विषयांवर शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# डिजिटल युगात गावाने ओळखली वेळेची किंमत आडाचीवाडीची 'मोबाईल मुक्ती' ते 'स्मशानभूमी अभ्यासिका'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** अनिकेत नितीन काळे आजच्या काळात जिथे लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत प्रत्येकाचा स्क्रीन टाईम (मोबाईल-टीव्ही पाहण्याची वेळ) वाढला आहे, तिथे पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी गावाने घेतलेला एक कौतुकास्पद निर्णय सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. गावाने केवळ आधुनिक पायाभूत सुविधाच निर्माण केल्या नाहीत, तर नवीन पिढीला अभ्यासाची गोडी लावण्यासाठी थेट स्मशानभूमीतच 'अंधाराकडून प्रकाशाकडे' नेणारा एक यशस्वी प्रयोग करून दाखवला आहे. याच अचूक नियोजनामुळे गावाला 'मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अभियानात' तालुक्यातून प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.



आडाचीवाडीच्या या यशामागे गावातील ग्रामपंचायतीचे आणि गावकऱ्यांचे कडक नियोजन आहे. रोज सायंकाळी ठीक ६.४० वाजता गावात एक भोंगा वाजतो. हा भोंगा वाजताच गावातील प्रत्येक घरात एकाच वेळी डिजिटल स्क्रीन बंद होतात. मोबाईल बाजूला ठेवून सर्व मुले आपापली पुस्तके घेऊन स्मशानभूमीच्या दिशेने एकत्र येतात. स्मशानभूमीच्या प्रशस्त आणि सुरक्षित शेडखाली मुले सलग दोन तास अभ्यास करतात. गावात केवळ प्राथमिक शाळेतील मुलांसाठीच नव्हे, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या मोठ्या तरुणांसाठी देखील याच परिसरात उत्तम ग्रंथालय (लायब्ररी) तयार करण्यात आले आहे. या प्रयोगामुळे मुलांच्या अभ्यासात कमालीची एकाग्रता दिसून येत आहे. आडाचीवाडी केवळ शिक्षणातच नाही, तर तंत्रज्ञानाच्या वापरातही पुढे आहे. ग्रामपंचायतीने गावात प्रभावी पाणी योजना राबवून घरोघरी नळ कनेक्शन दिले आहेत. मात्र, हे पाणी पुरवठा करताना मानवी वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी संपूर्ण पाणी पुरवठा यंत्रणा स्वयंचलित करण्यात आली आहे. यामुळे वेळेची, पैशांची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाण्याची मोठी बचत झाली आहे. नाम' फाउंडेशनची मोठी साथ: गावाने मनरेगा अंतर्गत शोषखड्डे, विहीर पुनर्भरण आणि जलतारा प्रकल्प तर राबवलाच, पण त्याचसोबत 'नाम फाउंडेशन'च्या मदतीने गावातील ओढ्याचे खोलीकरण करून पाण्याची साठवण क्षमता कित्येक पटीने वाढवली आहे. त्यामुळे गाव पाणी टंचाईतून कायमचे मुक्त झाले आहे. मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अभियानात पुरंदर तालुक्यातील एकूण १८ गावांनी सहभाग घेतला होता. यामध्ये: ''''आडाचीवाडी, एखतपूर, वाळूंज, गुरोळी, जेऊर ''''धालेवाडी, परिंचे, पानवडी, बेलसर, मांडकी ''''हिवरे, माळशिरस, झेंडेवाडी, वाघापूर, सोनोरी ''''वीर, सिंगापूर आणि सुकलवाडी या सर्व गावांमध्ये प्रत्येक निकषावर स्वतःला सर्वोत्तम सिद्ध करत आडाचीवाडी ग्रामपंचायतीने तालुका पातळीवर पहिला क्रमांक आपल्या नावावर केला. १००% सोलर पॅटर्न आणि ७.५ कोटींचा निधीआडाचीवाडी हे आता संपूर्णपणे सौरऊर्जे वर चालणारे वीजबिलमुक्त गाव बनले आहे. गावातील प्राथमिक शाळा, हायस्कूल, आरोग्य केंद्र, मंदिरे आणि प्रत्येक घरावर सोलर सिस्टीम बसवण्यात आली आहे.गावचे अंतर्गत १५ पाणंद रस्ते पूर्णपणे सिमेंटचे करण्यात आले असून, मुख्य रस्ता १ किलोमीटरपर्यंत ३० फूट रुंद करण्यात आला आहे. रस्त्यांच्या दुतर्फा झालेल्या हजारो देशी वृक्षांच्या लागवडीमुळे या रस्त्यांना 'हरित रस्ते' म्हणून ओळखले जाते. गावाची ही निसर्गपूरक वाटचाल पाहून वन विभागाने गावाला तब्बल ७.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, ज्यातून आता हे गाव एक प्रमुख 'पर्यटन केंद्र' म्हणून नावारूपास येत आहे. ''''ग्रामपंचायतीचा थेट संदेश'''' ''ग्रामविकासासाठी फक्त शासकीय निधी मिळवणे पुरेसे नसते, तर मिळालेल्या निधीचा योग्य वापर आणि त्याला लोकसहभागाची जोड देणे गरजेचे असते. आमच्या गावाने तेच केले. वीज, पाणी आणि रोजगाराच्या बाबतीत गाव स्वावलंबी करतानाच आम्ही मुलांच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. हा पुरस्कार गावातील प्रत्येक नागरिकाच्या शिस्तीचा आणि कष्टाचा गौरव आहे.'' ग्रामपंचायत प्रशासन, आडाचीवाडी (पुरंदर)


## बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. बारामती
### वाहन भाडेतत्वावर पुरविणे व पार्कींगचे निविदा बाबत

आमच्या संघाचे नंदन डेअरी, पॅकींग युनिट, निरा चिलिंग सेंटर, नंदन पशुखाद्य कारखाना, बल्क कुलर व पेट्रोल पंप ईत्यादी विभाग असुन त्यासाठीवाहने भाडेतत्वावर घ्यावयाची आहेत. तसेच कसबा येथील IOC पेट्रोल पंप येथील रिकामी जागा पे पार्कींग या बेसवर भाडे तत्वावर द्यावयाची असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल | टेंडर बयाणा |
|---|---|---|
| १ | संघाच्या डेअरी/बल्क कुलर विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना कुलर काम काजाकरिता जाणे येणे स्वच्छता साहित्या वाटप इ. पाच दरवाजे असणारी (कार टाईप) (ड्रायव्हरसह) वाहन प्रति कि.मी. दराने निविदा सिलबंद लिफाफ्यात देणे | रूपये १०,०००/- |
| २ | बारामती तालुक्यात संघाचे अधिकारी व कामगारांना बल्क कुलरवर दुरूस्तीच्या कामकाजाकरिता जाणे पाच दरवाजे असणारे (युटीलिटी टाईप ) ड्रायव्हरसह प्रति कि.मी. दराने निविदा सिलबंद लिफाफ्यात देणे | रूपये १०,०००/- |
| ३ | बारामती तालुक्यातील संघाच्या बल्क कुलरला डिझल वाटप करणे (टाटा एस टाईप) ड्रायव्हरसह प्रति कि.मी. दराने निविदा सिलबंद लिफाफ्यात देणे | रूपये १०,०००/- |
| ४ | संघाच्या शेजारील IOC पेट्रोल पंप येथील रिकामी जागेत पे पार्कींगचे कॉन्ट्रक्ट दर एक वर्षाकरिता देणेची निविदा सिलबंद लिफाप्यात देणे. | रूपये ५०,०००/- |

तरी इच्छुक व्यक्तींनी जाहिरात प्रसिध्द झालेपासून १० दिवसाचे आत दि.१०.०६.२०२६ रोजी दुपारी ११.०० वाजे पर्यत प्रतिकिलोमिटर भाडे दराचे कोटेशन ड्रायव्हर सह व एक वर्षाकरिता पे पार्कींग कॉन्ट्रक्ट दर सिलबंद पॉकेटमध्ये स्वतः चे अक्षरात संघाचे मुख्य ऑफीस कसबा, बारामती येथे पोहोच करणेत यावीत.कोटेशनसोबत वरील प्रमाणे बयाणा रक्कमेचा ड्राफ्ट राष्ट्रीयकृत बँकेचा संघाच्या नावाचा बारामती शाखेतील जोडावा अथवा ऑनलाईन जमा करावे टेंडर देणे अथवा नाकारण्यचे अंतिम अधिकार संघाच्या मा. संचालक मंडळाने कोणतेही कारण न दर्शवता राखुन ठेवले आहेत.

**श्री. डॉ. योगेश वामन राणे** – व्यस्थापकीय संचालक
**श्री. दत्तात्रय सदाशिव वावगे** – व्हाईस चेअरमन
**श्री. संजय रामचंद्र कोकरे** – चेअरमन

**बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. बारामती**
**पत्ताः कसबा, ताः बारामती, जिः पुणे. पिनः ४१३१०२**
**फोन नं. ०२११२-२२६७७२,२२२७७२, फॅक्स २२३२०४**
**e-mail address: baramati_doodh@yahoo.co.in**

# ‘वाघोली’ यावर्षी परिक्षणातून बाद!

## संतप्त ग्रामस्थांचे ‘मुंडण’ आंदोलनाने प्रशासनाचा निषेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** राज्य सरकारच्या माझी वसुंधरा अभियानात सलग तीन वर्षे राज्यस्तरीय पातळीवर प्रथम पुरस्कार प्राप्त वाघोली ता.शेवगाव या ग्रामपंचायतीस यावर्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या तालुकापातळीवरील परिक्षणातून बाद करण्यात आल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी प्रशासनाचा निषेध म्हणून पंचायत समिती कार्यालयासमोर प्रतिकात्मक स्वच्छता व मुंडण आंदोलन केले.

वाघोली ग्रामस्थ आखेगाव रस्त्यावरील स्व.गोपीनाथ मुंढे यांच्या पुतळ्यापासून वाजतगाजत मोर्चाने पंचायत समिती कार्यालयामध्ये आले. या मोर्चात लहान मुले, महिला व ग्रामस्थ निषेधाचे फलक घेवून सहभागी झाले होते. ग्रामस्थांनी कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन प्रांगण झाडून स्वच्छ केले. त्यानंतर पारंपारीक वादयाच्या गजरात लेझीम डाव खेळून गावावर झालेल्या अन्यायाचा निषेध केला. विविध वक्त्यांनी लोकसहभागातून केलेल्या रचनात्मक कामामुळे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त गाव असतांना देखील गावास डावलून इतर गावांना प्राधान्य दिल्याचे राजेंद्र जमधडे, बाबासाहेब गाडगे, भिमराज सागडे, कचरु चोथे, डॉ. निरज लांडे, शिवाजी भिसे, अनंता उकिर्डे, महादेव पाटेकर, गणेश म्हस्के , मयुरी ब्राम्हणे, संजय शिंदे आदींनी भाषणातून सांगितले.

तर पंचायत समितीच्या प्रवेशव्दारात उमेश भालसिंग यांच्यासह ग्रामस्थ व युवकांनी मुंडण करत पुरस्कार नको पण न्याय दया अशी मागणी केली. यावेळी उमेश भालसिंग म्हणाले की, गावाने गेल्या १० वर्षामध्ये लोकसहभागातून व श्रमदानातून पर्यावरण संतुलनामध्ये व



ग्रामविकासामध्ये रचनात्मक काम उभे केले आहे. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, नदी खोलीकरण, बायोगॅस निर्मिती, विषमुक्त शेती, मुख्यमंत्री सोलर कृषी वाहीनी योजना,शिक्षण ,आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय काम आहे. मात्र यावर्षी मुख्यमंत्री पंचायत समृध्द पंचायतराज अभियानात

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात गावाने केलेले स्वमुल्यांकन व प्रशासनाचे गुणांकन, गावांची निवड याबाबत कुठलीही अधिकृत घोषणा प्रशासनाने केलेली नाही.तरीदेखील पुढील स्तरावर गाव मुल्यमापन करण्याची लगबग सुरू आहे, ही गाव निवडतांना कुठले निकष लावले. याबाबत देखील गौडबंगाल आहे. त्यामुळे हे अभियान व त्यातील राजकीय हस्तक्षेपाबाबत संशयास्पद वातावरण निर्माण झाले आहे, असा आरोप ग्रामस्थांनी केला.याचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत पुढील प्रक्रिया थांबवावी..अन्यथा याबाबत मोठा प्रक्षोभ होण्याची शक्यता आहे.

परिक्षणासाठी आलेल्या समितीने आर्थिक हीतसंबंध जोपासत राजकीय दबावातून गावास तालुकास्तरावरच वगळले आहे. या अन्यायकारक परिक्षणामुळे अहोरात्र झटणा-या ग्रामस्थांचा हिरमोड झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने केलेले गुणांकन जाहीर करुन सर्व गावांचे दुस-यांदा परिक्षण करावे.तोवर जिल्हा, विभाग व राज्यपातळीवरील परिक्षण प्रक्रिया थांबवण्यात यावी. अन्यथा या विरोधात चौंडी येथे ३१ मे रोजी मुख्यमंत्र्यांसमोर आंदोलन करुन दाद मागणार आहोत.

सरपंच सुष्मिता भालसिंग ,उपसरपंच कल्पना भालसिंग,हिराबाई शिंगटे, मोहन गवळी, संतोष आल्हाट,रावसाहेब शिंगटे, काकासाहेब आल्हाट, विष्णू घनवट, ज्ञानेश्वर उगले, सचिन लांडे, सुभाष बरबडे, बाळासाहेब देशपांडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी निवेदन स्विकारत याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे ग्रामस्थांचे म्हणणे सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले.

द•ख•ल

## लालबहादूर शास्त्री विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**श्रीगोंदा :** तालुक्यातील टाकळी कडेवळीत येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात एस.एस.सी. मार्च १९९५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत आनंदी आणि भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल अनेक वर्षांनंतर जुने मित्र, वर्गमित्र, शिक्षक आणि आठवणी एकाच छताखाली जमल्याने विद्यालय परिसरात अक्षरशः जुन्या दिवसांची री-रन फिल्मच रंगली. तेच बाक, तीच घंटा आणि तोच मित्रांचा गोंधळ - फरक फक्त केसांच्या रंगाचा आणि जबाबदाऱ्यांचा! यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या विकासासाठी वॉल कंपाऊंड उभारणीसाठी तब्बल २५ हजार रुपयांची देणगी विद्यालयाला सुपूर्द केली. माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विद्यालय प्रशासन, शिक्षकवृंद तसेच समस्त ग्रामस्थांनी मनापासून कौतुक केले. विद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचे हार्दिक आभार मानण्यात आले. शाळा फक्त शिक्षण देत नाही, ती आयुष्यभरासाठी नाती घडवते, याची प्रचिती या स्नेहमेळाव्यातून पुन्हा एकदा आली.कार्यक्रमात जुन्या आठवणींना उजाळा, शिक्षकांचा सत्कार, हास्य-विनोद आणि भावनिक क्षणांनी वातावरण भारावून गेले. १९९५ बॅच अजूनही एकदिलाने उभी आहे, हे या मेळाव्याने सिद्ध करून दाखवले.

## नगराध्यक्ष अरुण मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात



**अमरापुर :** शेवगाव शहराचे नगराध्यक्ष अरुण मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक, राजकीय, क्रीडा तसेच विविध क्षेत्रातील मित्रपरिवार व नागरिकांनी उपस्थित राहत शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी बोलताना नगराध्यक्ष अरुण मुंढे म्हणाले की, शिवसेना शिंदे गटामुळे मला नगराध्यक्ष पदाची संधी मिळाली. आज सर्व नगरसेवक माझ्या पाठीशी असून, सर्वांनी मिळून शेवगाव शहराच्या विकासासाठी काम करावे, हीच माझी अपेक्षा आहे. शेवगाव शहरासाठी महत्त्वाची असलेली पाणीपुरवठा योजना लवकरच यशस्वी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. ते पुढे म्हणाले की, मी सुरुवातीपासून जनतेसाठी संघर्ष करत आलो आहे. कबड्डीपटू म्हणून कार्य करत असताना अनेक मित्रबंधूंनी वेळोवेळी सहकार्य केले. शेवगावकरांनी प्रेमापोटी मला नेहमी साथ दिली असून, त्यांच्या विश्वासासाठी मी सदैव पाठीशी राहील. कार्यक्रमात नगरसेवक वजीरभाई, शरदचंद्र गटाचे शेवगाव तालुका अध्यक्ष हरीष भारदे यांनी शुभेच्छा देत आपल्या भावना व्यक्त केल्या. नगरसेवक प्रा. सुनिल काकडे यांनी अरुण मुंढे यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आशुतोष डहाळे, ताहेर पटेल, रोहित काथवटे, शब्बीरभाई आदीं सर्व नगसेवक यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. यावेळी अरुणभाऊ मुंढे यांचे बंधू उदय मुंढे, नंदू मुंढे तसेच संपूर्ण मुंढे परिवार उपस्थित होता. कार्यक्रमास सामाजिक, राजकीय मित्रमंडळी, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धार्मिक कार्यक्रमात अल्पवयीन मुलीची छेडछाड

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागात एका अल्पवयीन मुलीची धार्मिक कार्यक्रम सुरू असताना एका जिहादी मानसिकतेच्या तरुणांकडून जाणिवपूर्वक अपमान जनक व लज्जा उत्पन्न होईल अशी छेड काढण्यात आली. या घटनेनंतर पिडीताचा मावसभाऊ आरोपीस जाब विचारण्यासाठी गेला असता आरोपीने त्यास ही शिवीगाळ करत मारहाण केली. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पोलिसांनी तपास सुरू करून आरोपीच्या शोधात पोलिस पथक तातडीने रवाना केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, एका गावात धार्मिक कार्यक्रम सुरू असुन या धार्मिक कार्यक्रमासाठी ही पिडीता आपल्या आजीसोबत जात असताना आरोपीने मुलीची छेड काढली. या मुलीने त्यास विरोध केला असता आरोपी तेथुन फरार झाला. परत दुसऱ्या दिवशीही आरोपीने पुन्हा मुलीची छेड काढली असता पिडितेने आपल्या मावसभावास हकीकत सांगितली. यावेळी मावसभावाने आरोपीस जाब विचारला असता त्याला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. घटनेनंतर मुलीच्या नातेवाईकांनी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. या प्रकरणी पोलिसांनी अल्पवयीन मुलीच्या संरक्षणासंदर्भातील कायद्यांतर्गत तसेच बाल अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून संबंधित संशयितांचा शोध सुरू आहे.

## राजेंद्र नागवडेंना विधान परिषदेवर संधी द्यावी

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून नागवडे कुटुंबाने समाजसेवेचे व्रत हाती घेऊन श्रीगोंदा तालुका प्रगतीपथावर आणला. नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे हे धुरा सक्षमपणे हाताळत आहे.



सर्वसामान्यांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची कार्यशैली सर्वांना भावली आहे. येत्या विधान परिषदेच्या निवडणुकीत राजेंद्र नागवडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने उमेदवारी द्यावी अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुक्याचे भाग्यविधाते सहकार व शिक्षण महर्षी स्व. शिवाजीराव नागवडे बापूंनी जुन्या जाणकार सहकारी मित्रांना बरोबर घेऊन श्रीगोंदा तालुक्यात सहकाराची मूर्तमेढ रोवली. त्यामध्ये सहकारी साखर कारखाना, शैक्षणिक संस्था, घोड- कुकडीचे पाणी, इ. मुळे कष्टकरी शेतकऱ्यांची आज मोठी प्रगती होताना दिसते. ते केवळ नागवडे कुटुंबांमुळेच शक्य झाले आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. निवेदनावर कारखान्याचे उपाध्यक्ष मेघा औटी यांचे पती संदीप औटी, सुभाष शिंदे, विश्वनाथ गिरमकर, श्रीनिवास घाडगे, एकनाथ आळेकर, राकेश पाचपुते, प्रशांत दरेकर, योगेश भोईटे, मारुती पाचपुते, दत्तात्रय काकडे, भाऊसाहेब नेटके, बंडू जगताप, प्रा. सुरेश रसाळ, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, शरद जगताप, हेमंत नलगे, सुरेश खरात, बाळासाहेब लगड, किसन कोल्हटकर, धनंजय घाडगे, भरत नलगे, रामदास लबडे, सरपंच प्रमोद शिंदे, दादासाहेब कुरुमकर, लक्ष्मण भोईटे, विश्वनाथ बोरुडे यांच्या स्वाक्षऱ्या आहे.



## ताजनापूर लिफ्ट योजनेतून गदेवाडीला पाणीपुरवठा करा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चापडगाव :** शेवगाव तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून गदेवाडी गावातील शेतकरी आणि ग्रामस्थांचे जीवन अक्षरशः पाण्यासाठी कोलमडले आहे. पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा आणि उभ्या पिकांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असताना, गावासाठी जीवनदायिनी ठरणारी ताजनापूर लिफ्ट योजना अद्यापही रखडलेली असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गदेवाडी परिसरात ताजनापूर लिफ्ट योजनेअंतर्गत पाईपलाईनचे काम मोठ्या प्रमाणात पूर्ण झाले असले, तरी अद्याप प्रत्यक्षात काही ठिकाणी पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेली पिके करपण्याच्या मार्गावर असून जनावरांसाठी पाण्याची टंचाई अधिकच तीव्र बनली आहे. गावातील विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत असल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहेत. कामे झाली पण पाणी नाही, मग योजनेचा उपयोग काय? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. ताजनापूर लिफ्टचे पाणी गदेवाडी मधील सर्व ठिकाणच्या पॉईंट ला सोडण्यात यावे अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नानासाहेब मडके, सरपंच लक्ष्मण साखरे,बप्पासाहेब कराळे, अर्जुन मडके, ज्ञानेश्वर साखरे यांच्यासह शेतकरी व नागरिकांनी अर्जाद्वारे मागणी केली.

## बोधेगावात ‘फोटोग्राफी’चे दरवाढ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** पेट्रोल डिझेल दरवाढ तसेच लॅब मालकाने वाढविलेले दर, वाढत्या कॅमेरा किंमती, वाढलेली महागाई, फोटोग्राफी व्यवसायाला मोठा फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर, शेवगाव तालुक्यातील बोधेगाव परीसरातील फोटोग्राफर बांधवांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी महागाई, बदलत्या काळातील आव्हाने, वाढती स्पर्धा व वेळेची अनियमितता यावर चर्चा झाली. याचा विचार करून फोटोग्राफी क्षेत्रात दरवाढ करण्याचा निर्णय असोसिएशनने घेतला.

बोधेगाव फोटोग्राफर असो. चे अध्यक्ष सचिन गवारे व उपाध्यक्ष विशाल कासुळे यांच्या उपस्थितीत बैठक साई लॉन्स येथे झाली. यात १ जुन पासून बोधेगाव परीसरातील फोटोग्राफी क्षेत्रात दरवाढ करण्याचे निश्चित केले. याप्रसंगी अमोल भिसे, अक्षय कवडे, राम पोटभरे, अमोल म्हस्के, संजय घुले, उमेश शिंदे, अनवर शेख, सचिन सावळकर, संतोष गंगाधर, राज शेख, निसार शेख, विवेक झांबरे, ऋषी देशमुख, ऋषी कोरडे, शरद कराड, विशाल पांडव, अवि अभंग, भगवान पालवे, महेश घरगणे, जगदिश दसपुते, योगेश गर्जे जय केसभट, शफीक शेख राहुल थोरवे, कृष्णा खेडेकर, गोकुळ गुंजाळ उपस्थित होते.

## भिलवडे-मोहोज देवडे रस्ता खुला!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानुर :** गत दहा ते पंधरा वर्षांपासून बंद असलेला तालुक्यातील भिलवडे ते मोहोज देवडे हा रस्ता भिलवडे गावच्या ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने खुला झाला आहे. हा रस्ता खुला झाल्याचा फायदा या रस्त्याच्या लगत असलेल्या जवळपास एकशे दहा शेतकऱ्यांना होणार आहे. भिलवडे ते मोहोज देवडे हा रस्ता केवळ एक कि.मी. चा असला तरीही या रस्त्याची वहिवाट काही शेतकऱ्यांनी बंद केली. त्यामुळे शेतकऱ्यांना भिलवडेतून मोहोज देवडे गावाला जाण्यासाठी दूरच्या रस्त्याने जावे लागायचे. शेतकऱ्यांची ही अडचण दूर करण्यासाठी भिलवडेचे सरपंच सुरेश बडे, उपसरपंच अमोल बडे, मा. सरपंच पंडित बडे, रामराव बडे, बाबासाहेब बडे, विष्णू बारगजे,



रामकिसन बडे, संजय बडे, मुरलीधर बडे, विजय बडे, अशोक भाबड, सचिन बडे, लक्ष्मण बडे, गोरक्ष बडे, बाळू बारगजे यांनी पुढाकार घेऊन सर्व शेतकऱ्यांशी चर्चा केली. हा रास्ता जर खुला झाला तर त्याचा मोठा फायदा भिलवडे व मोहोज देवडे येथील शेतकऱ्यांना होऊन दळण वळणाचा मार्ग खुला होईल हे पटवून दिले. या नंतर ज्यांनी या रस्त्याला विरोध केला त्या शेतकऱ्यांनी रास्ता खुला करून देण्यास तयारी दर्शवल्या नंतर सर्व शेतकऱ्यांचे आमचा रस्त्याच्या कामाला विरोध नाही असे स्टॅम्पवर लेखी म्हणणे लिहून घेतले. या नंतर प्रशासकीय पातळीवर सरपंच बडे यांनी पुढाकार घेत या रस्त्याची मोजणी करून घेतली तर त्या नंतर मार्ग निश्चित करण्यात आला.

दोन जेसीबी लावून मग बारा फुटी रास्ता तातडीने तयार करण्यात आला. या रस्त्यावरून आता कोणतेही चारचाकी वाहन जाऊ शकत असल्याने या रस्त्याचे लगत असलेल्या भिलवडे व मोहोज देव्हडे येथील शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. हा रास्ता खुला व्हावा या साठी मोहोज देव्हडे च्या तलाठी मनीषा बेळगे, मंडलाधिकारी जयश्री महामुनी, भिलवड्याच्या तलाठी रेखा खंडागळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मनसेचे पाथर्डी तालुका पदाधिकारी नियुक्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील मनसे पदाधिकारी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशान्वये व संपर्क अध्यक्ष नयन कदम यांच्या सूचनेनुसार उपजिल्हाध्यक्षपदी मोहरी येथील देविदास हंडाळ, उपतालुकाध्यक्षपदी सोमठाणे येथील रामेश्वर काकडे, आल्हणवाडी येथील विनोद गव्हाणे, शिरसाटवाडी येथील एकनाथ सानप यांची निवड मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी नियुक्तीपत्र देत केली.

मनसेची नुकतीच पाथर्डी येथील शासकीय विश्रामगृहावर बैठक पार पडली यावेळी तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संघटन बळकट करून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका लढवण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी दिल्या. तालुक्यात विरोधी पक्षच उरला नसून सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे परंतु मनसे सक्षम पर्याय म्हणून जनतेसमोर उभा राहणार असून येत्या काळात ग्रामपंचायती पासून सर्व निवडणुका संघटना बांधणी करून लढणार असल्याचा निर्धार पालवे यांनी व्यक्त केला.

तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे पक्षात स्वागत करत जोमाने काम करा जिथे मदत लागेल तिथे जिल्हाध्यक्ष व मी नेहमी आपल्या सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला पक्ष बांधणीसाठी लवकरच गाव तिथे शाखा उपक्रम राबवणार असल्याचेही तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी म्हटले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे काम जोमाने करणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या बैठकीस मनसे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, महिला सेना तालुकाध्यक्ष रेणुका फुलशेटे, शहराध्यक्ष संदीप काकडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण शिरसाट, विशाल भापकर यांसह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक हजर होते.

## झिंजुर्के महाराजांचे गंगा स्वच्छतेचे कार्य प्रेरणादायी : आ. विलास भुमरे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** श्रीक्षेत्र पैठण येथील गंगा-गोदावरी मातेच्या स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या ह.भ.प. श्रीराम महाराज झिंजुर्के यांच्या कार्याचे आ. विलास बापू भुमरे यांनी कौतुक करत हे कार्य प्रेरणादायी व पुण्यदायी असल्याचे गौरवोद्गार काढले. अधिक मासातील शुद्ध एकादशी निमित्त आयोजित स्वच्छता सेवेनंतर ते बोलत होते.

गेल्या चार वर्षांपासून ह.भ.प. श्रीराम महाराज झिंजुर्के हे जोग महाराज संस्थानाच्या भक्तजन, माता-भगिनी व तरुणांच्या सहकार्याने दर महिन्याच्या शुद्ध एकादशीला गंगा-गोदावरी नदीपात्राची स्वच्छता करत आहेत. दोन तास चालणाऱ्या या सेवेत नदीतील सर्व प्रकारची घाण काढून परिसर स्वच्छ करण्यात येतो. यासोबतच फड पद्धतीने कीर्तन, जागर, काकडा आदी धार्मिक सेवाही पार पडतात.

या सेवेसाठी संस्थानचे शिष्यगण स्वतःचे साहित्य घेऊन सहभागी होत असून कोणत्याही प्रकारची वर्गणी घेतली जात नाही.

## निघोज ग्रामस्थांचे धार्मिक संस्कृतीला पाठबळ : आ. दाते

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी निघोज ग्रामस्थांचे योगदान मोठे असून सोमनाथ महाराज वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी भागवत कथेचे आयोजन करीत एक धार्मिक संस्कृतीला पाठबळ देणारे काम केले असल्याचे प्रतिपादन आ. काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात गुरुवार दि.२८ पासून श्रीमद् भागवत महापुराण कथेचा शुभारंभ आ. दाते तसेच माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन तसेच, संत ज्ञानेश्वर प्रभू रामचंद्र महाराज, माता श्री मळगंगा देवी यांचे पुजन करुन सुरू झाला कथाप्रवक्ते भागवताचार्य बाबा महाराज खामकर या कथेचे निरुपण करणार आहेत. यावेळी आमदार दाते यांनी निघोज परिसरातील वर्षातील बाराही महिने धार्मिक सेवाभाव



सातत्याने सुरू असून धार्मिक संस्कृतीला देशात मोठे महत्त्व आहे. कथाप्रवक्ते भागवताचार्य बाबा महाराज खामकर हे गेली अनेक वर्षांपासून प्रवचन व कीर्तन माध्यमातून सेवाभाव करीत असून निघोज व परिसरातील भावीकांना या कथेचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळणार आहे. सोमनाथ महाराज वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व सर्व ग्रामस्थ लोकसहभागातून या कथेला मदत करणार आहेत ही मोठी गौरवास्पद बाब असून अशाप्रकारे धार्मिक सेवाभाव व आपली संस्कृती जतन करण्याचे काम होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आ. दाते यांनी व्यक्त केले आहे. माजी आ. पोपटराव गावडे यांनीही या धार्मिक कार्यक्रमाचे कौतुक करताना सांगितले की सोमनाथ महाराज वरखडे हे सातत्याने या परिसरात धार्मिक कार्यक्रम होण्यासाठी सर्वाधिक योगदान देत असतात. यावेळी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख डॉ भास्करराव शिरोळे, सोमनाथ महाराज वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष रखमाजी कापसे, माजी सरपंच भास्कर उचाळे, ज्येष्ठ मार्गदर्शक नामदेवराव थोरात माजी सरपंच चित्राताई वराळ पाटील, संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, बाळासाहेब लामखडे, रोहिदास लामखडे, शरद ठुबे, रामदास लंके, शिवाजीराव वराळ, बाबाजी तनपुरे, रामदास नरड, माजी ग्रामपंचायत सदस्या आशाताई वरखडे, सुमन कवाद आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक शरद ठुबे यांनी केले शेवटी कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे यांनी आभार मानले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.३० मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## कॅप्टन प्रकरण खरात गुंडाळल्याचा दमानिया याचा आरोप
### एस आय टी बरखास्त झाल्याचा संशय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : कॅप्टन खरात प्रकरण येवढे गंभीर असताना त्याचा पुढील तपास पहाता सर्व प्रकरण गुंडाळण्यात आले असून तपासासाठी स्थापन्यात आलेली एस आय टी बरखास्त झाल्या चा संशय अंजली दमानिया यांनी केला आहे. या प्रकरणात खऱ्या अर्थाने ज्या मोठ्या माश्यांची चौकशी एस आयटी मार्फत चौकशी होणे गरजेचे होते . परंतू घटनेला अडीच महिने उलटून ही ज्या पद्धतीने तपास व्हायला पाहिजे होता तो झाला नाही . सुरवातीला ज्या प्रमाणे असंख्य मोठ मोठ्या राजकीय लोकांची नाव पुढे येत होती त्यांचा ही तपास झाला नाही . त्याने जमीनीत गुंतवणूक तपास काय आहे. या प्रकरणात त्यांचा प्रामुख्याने सहभाग होता त्या रूपाली चाकणकरांची चौकशी झाली नाही. एस आय टीचा काय सुरू आहे की एस आयटी गुंडाळली याचे स्पष्टीकरण कुणी देत नाही . एस आय टी च्या प्रमुख तेजस्विनी सातपुते या पुण्यात उपचार घेत असल्याचे समजते. त्यामुळे या प्रकरणाची सर्व सेटींग वरून झाली आहे का ? असा थेट आरोप दमानिया यांनी तपास यंत्रणा वर केला आहे.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा आज भाजपमध्ये अधिकृत प्रवेश

## विधान परिषद उमेदवारीची चर्चा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भारतीय जनता पक्षातील प्रवेश अखेर निश्चित झाला असून आज, शनिवार दि. ३० मे रोजी मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यांचा अधिकृत पक्षप्रवेश होणार आहे. या घडामोडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

विधानसभा निवडणुकीपासूनच प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये जाणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या. अनेकदा त्यांच्या भाजप प्रवेशाच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र, तनपुरे यांनी आपण शरद पवार गटातच असल्याचे स्पष्ट केले होते. अखेर आजच्या पक्षप्रवेशामुळे या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप नेतृत्वाकडून प्राजक्त तनपुरे यांना विधान परिषदेची उमेदवारी देण्याबाबत सकारात्मक संकेत मिळाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या संदर्भात पुढाकार घेतल्याची चर्चा असून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनीही या राजकीय घडामोडीत महत्त्वाची भूमिका बजावल्याचे बोलले जात आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तनपुरे यांनी माघार घेतल्यानंतर त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेला अधिक वेग आला होता. भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारसभेत मुख्यमंत्री फडणवीस व इतर वरिष्ठ नेत्यांनी तनपुरे यांच्यावर केलेली स्तुतीही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात होती. प्राजक्त तनपुरे हे अभ्यासू, आक्रमक आणि प्रभावी वक्ते म्हणून ओळखले जातात. मंत्रीपदाच्या कार्यकाळात उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानही मिळाला होता.

त्यामुळे आगामी काळात भाजपकडून त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तनपुरे यांच्या भाजप प्रवेशामुळे शरद पवार गटाला जिल्ह्यात मोठा धक्का बसल्याची चर्चा असून, राहुरी मतदारसंघाला पुन्हा मंत्रीपदाचा 'लाल दिवा' मिळण्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. पक्षप्रवेशासाठी तनपुरे समर्थक मोठ्या संख्येने मुंबईकडे रवाना झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# 'भरारी पथक' फक्त कागदावरच ?

## लोणी व्यंकनाथ एमआयडीसीतील हजारो ब्रास माती चोरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी** : श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील एमआयडीसीच्या आरक्षित जागेतून मोठ्या प्रमाणात माती व मुरूमाचा अवैध उपसा सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या प्रकरणामुळे महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून या अवैध उत्खननाबाबत सातत्याने वृत्त प्रसिद्ध होत असतानाही कारवाई होत नसल्याने भरारी पथक केवळ कागदावरच असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

एमआयडीसी प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदार व पोलीस प्रशासनाला लेखी पत्र देऊन कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर श्रीगोंदा तहसीलदार तथा तालुका दंडाधिकाऱ्यांनी मे २०२६ या संपूर्ण महिन्यासाठी विशेष भरारी पथकांची नियुक्ती केली होती. २४ तास गस्त ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. प्रत्येक दिवसासाठी स्वतंत्र पथक, पर्यवेक्षकीय अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात लोणी व्यंकनाथ एमआयडीसी परिसरात विनापरवाना मोठ्या प्रमाणावर माती उपसा सुरूच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

भरारी पथक नेमके कुठे कार्यरत होते, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. दिवसाढवळ्या हजारो ब्रास मातीची वाहतूक होत असताना महसूल प्रशासनाला याची माहिती नव्हती का, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. तहसीलदारांनी आदेशात स्पष्ट नमूद केले होते की, गस्तीदरम्यान हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. त्यामुळे आता या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रत्यक्षात कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, एमआयडीसी प्रशासनाचे पत्र आणि वारंवार प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांनंतरही कारवाई होत नसल्याने या अवैध माती तस्करीला महसूल प्रशासनाचे मूक पाठबळ असल्याची चर्चा रंगू लागली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नातवानेच केला आजोबांवर गोळीबार

## मोमीन आखाडा येथील घटना; प्रकृती गंभीर?



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुका पुन्हा एकदा गोळीबाराच्या धक्कादायक घटनेने हादरला असून,जून्या वादाच्या कारणावरून आरोपी नातवानेच आपल्या वयोवृद्ध चुलत आजोबांवर गावठी कट्ट्यातून गोळीबार केल्याचा धक्कादायक घटना घडली.प्रविण बाबासाहेब कोहकडे ( वय २५ रा.मोमीन आखाडा ) असे आरोपीचे नाव आहे.त्याने घटनास्थळावरून फरार झाला.सदरची राहुरी तालुक्यातील मोमीन आखाडा शिवारात शुक्रवारी (दि.२९) मे रोजी पहाटेच्या सुमारास घडली.दगडू गंगाराम कोहकडे, (वय ७३, रा.मोमीन आखाडा),असे गंभीर जखमी झालेल्या चुलत आजोबांचे नाव आहेत.

आजोबा शुक्रवारी पहाटे सहा वाजे दरम्यान नेहमीप्रमाणेच बाळेश्वर डोंगर परिसरात फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी प्रवीण कोहकडे हा समोरून मोटारसायकलवर आला.'तु माझ्यावर खूप गुन्हे दाखल केले' असे म्हणत दगडू कोहकडे यांच्याशी वाद घालू लागला.दोघांमधील वाद विकोपाला गेला.त्यावेळी आरोपी प्रवीण कोहकडे याने दगडू कोहकडे यांच्या छातीवर गावठी कट्ट्यातून अगदी जवळून गोळी झाडली. तो तेथून घटनास्थळावरून फरार झाला.त्यावेळी गोळी लागताच वयोवृद्ध आजोबा दगडू कोहकडे हे जमिनीवर कोसळले होते. याबाबत घटनेची माहिती नातेवाईकांना कळताच दगडू कोहकडे यांना तात्काळ अहिल्यानगर येथे एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.तेथे त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू असून मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर, राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. आरोपीची माहिती कळल्यानंतर पोलीसांनी शोध सुरू केला.या घटनेबाबत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल प्रक्रिया सुरू होती.आरोपीचा शोध घेण्याकामी पोलिस पथके रवाना झाल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून समजते.या घटनेनंतर मोमीन आखाडा परिसरात एकच खळबळ उडाली.

### आरोपी सराईत गुन्हेगार असल्याची पार्श्वभूमी ?

आरोपी प्रविण बाबासाहेब कोहकडे हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यांवर घरफोडी व आर्मक्ट अन्य वेगवेगळ्या ठिकाणी गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

# शिर्डीत खा. संजय राऊत यांच्या उपस्थितीत शिवसेनेचा मेळावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : सरकारच्या चुकीच्या धोरणांवर कडाडून प्रहार करण्यासाठी शिवसेना उबाठा गटाची बुलंद तोफ खा. संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाव्यापी कार्यकर्ता व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रमुख सचिन कोते यांनी दिली आहे. सदर कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत खा संजय राऊत, खा. भाऊसाहेब वाकचौरे, मा खा चंद्रकांत खैरे व आ अंबादास दानवे यांचे उपास्थित शिर्डीतील विमानतळ रोडवरील साई किमया गार्डन येथे पार पडणार आहे.

मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रमुख सचिन कोते ,जगदीश चौधरी, राजेंद्र दळवी यांनी पत्रकारांशी संवाद साधला यावेळी ते म्हणाले की शिर्डीतील मेळाव्यासाठी जिल्हाभरातील शिवसैनिक, पदाधिकारी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थिती लावणार आहेत. अनेकांनी शिवसैनिकांच्या जोरावर आमदार, खासदार मंत्रीपदे मिळविली अन् पक्षाशी गद्दारी केली मात्र शिवसैनिक आजही निष्ठेने पक्षाच्या सोबत उभा असून सदर मेळाव्यास शिवसेनेची बूलंद तोफ खा संजय राऊत मार्गदर्शन करणार आहेत तरी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा सचिन कोते यांनी केले आहे.

# सुपारी देऊन स्वतःवरच हल्ला

## फिर्यादीच निघाला कटाचा मास्टरमाईंड | गोळीबार प्रकरणाला नाट्यमय वळण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळ घडलेल्या गोळीबार आणि हल्ला प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले असून, या गुन्ह्यातील फिर्यादीच संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

स्वतःवर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी देत बनावट गुन्हा रचल्याचा खळबळजनक खुलासा तोफखाना पोलिसांच्या तपासातून समोर आला आहे. दि. २४ मे २०२६ रोजी चिरंजीव दत्तात्रय गाढवे (वय ३१, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, ता. जि. अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीनुसार, ते मित्र राजू काळे यांच्यासह पाईपलाईन रोडवरील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानात चहा पिण्यासाठी गेले असताना अचानक तीन ते चार अनोळखी युवकांनी त्यांच्यावर हल्ला केला. गाढवे हे काऊंटरवर पाण्याची बाटली घेत असताना आरोपींपैकी एकाने त्यांच्या पाठीवर धारदार शस्त्राने वार केला. त्यानंतर घाबरलेल्या अवस्थेत ते दुकानात पळाले असता आरोपींनी दुकानात घुसून आमच्या पप्पू शेठचं, गौरव भाऊचं नाव गुन्ह्यात घेतोस का? असे म्हणत लाथाबुक्क्यांनी व धारदार वस्तूने मारहाण केली. घटनास्थळावरून जाताना आरोपींपैकी एकाने कमरेतील पिस्तूल काढून हवेत गोळीबार करत मॉपेडवरून पलायन केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते.

या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गु.रजि. नं. ४०१/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), १२५, ३(५) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता काळ्या रंगाच्या मॉपेडवर चार युवक तोंडाला मास्क लावून येताना आणि पसार होताना दिसून आले. त्याआधारे पोलिसांनी दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिल्यानंतर त्यांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले. दरम्यान, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी ऋतिक आनंद हरिहर हा सावता नगर परिसरातील त्याच्या राहत्या घरी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून ऋतिक आनंद हरिहर (वय १९, रा. सावता नगर, पम्पिंग स्टेशन, भिंगार, अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने धक्कादायक खुलासा करत हा संपूर्ण हल्ला फिर्यादी चिरंजीव गाढवे यानेच सुपारी देऊन घडवून आणल्याची कबुली दिली. विशिष्ट व्यक्तींना गुन्ह्यात अडकविण्याच्या उद्देशाने स्वतःवर हल्ला घडवून आणण्याचा कट रचण्यात आल्याचा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांनी काढला आहे. आरोपी ऋतिक हरिहर याच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेले सुमारे ४० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल (कट्टा) जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या गुन्ह्याचा उलगडा करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पोलीस कर्मचाऱ्यांच्या भागीदारीतून जन्माला आली गुन्हेगारी?

## गोळीबाराच्या ठिकाणी सहाय्यक पोलीस अधीक्षकांची भेट; तपासाला वेग..

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील बाभूळगाव येथे घडलेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर सहाय्यक पोलीस अधीक्षकांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिकांकडून माहिती घेत घटनेचा आढावा घेतला असून तपासाला गती देण्याच्या सूचना दिल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान या प्रकरणामुळे स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. घटनेमागे अवैध धंदे, स्थानिक वाद आणि काही पोलीस कर्मचाऱ्यांच्या कथित भागीदारीची चर्चा रंगू लागल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. काही स्थानिकांनी अवैध व्यवसायांना संरक्षण मिळत असल्याचा आरोप केला असून त्यामुळे गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. तीन ते चार दिवसांपूर्वी वाळू तस्करातील दोन गटांमध्ये विरगाव ठाण्यातील बाभूळगावात जोरदार राढा झाला होता. यात गोळीबारासारखी गंभीर घटना घडल्याने कायदा–सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे घटनेनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे दिसून येते.

आता तपासातून नेमकं काय समोर येतं, पोलीस कर्मचाऱ्यांच्या सहभागाच्या चर्चेत तथ्य आहे का, आणि या प्रकरणात नेमकी जबाबदारी कुणाची ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक नागरिकांकडून या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीनंतर तपासाची दिशा स्पष्ट होणार का, आणि परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई होणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे...

### शेतकरी नव्हे सगळे वाळू तस्करच..

गोळीबारापर्यंत पोहोचलेल्या वाळू तस्करांच्या वादानंतर नव्या आरोपांनी प्रकरणाला वेगळंच वळण मिळालं आहे. एका बाजूने शेतकऱ्यांना मारहाण झाल्याचा दावा करत गुन्हा दाखल करण्यात आला; मात्र दुसरीकडे हे शेतकरी नसून वाळू तस्करच होते, असा थेट आरोप करण्यात आला आहे.

### घटना घडली तेव्हा गुन्हे शाखेचे कर्मचारी घटनास्थळी...

गोळीबाराची घटना घडली तेव्हा छत्रपती संभाजीनगर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे दोन कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते, असा गंभीर दावा अर्जुन दाभाडे यांच्या पत्नीने केला आहे. तसेच या घटनेत हे दोन कर्मचारी ज्या थार गाडीतून आलं होते. ती देखील या वादामध्ये नुकसान झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. यामुळे गुन्हे शाखेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. या आरोपांमुळे संपूर्ण प्रकरण अधिकच गाजण्याची चिन्हे आहेत.

### प्रतिक्रिया.

घटनेनंतर आमचे सहाय्यक पोलीस अधीक्षक घटनास्थळी पाहणीसाठी गेले होते. त्यांनी घटनास्थळाचा सविस्तर आढावा घेतला असून संपूर्ण घटनेची माहिती घेतली आहे. प्रकरणाचा तपास सुरू आहे.

**प्रकाश जाधव (पोलिस अधीक्षक छ. संभाजीनगर ग्रामीण)**

# भटाणा तलावात मासेमारीसाठी गेलेल्या व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील भटाणा येथील तलावात शुक्रवारी सकाळी मासेमारीसाठी गेलेल्या एका ५५ वर्षीय इसमाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. रहीम युसुफ शेख असे मृत व्यक्तीचे नाव असून त्यांच्या निधनामुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रहीम शेख हे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तलावात मासेमारी करत होते. शुक्रवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे तलावात मासे पकडण्यासाठी गेले होते. यावेळी मासेमारीसाठी टाकलेल्या जाळ्यात त्यांचा पाय अडकल्याने त्यांना पाण्यातून बाहेर येता आले नाही. हातपाय हलवता न आल्याने त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. दरम्यान, बराच वेळ होऊनही ते घरी परतले नाहीत, त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांनी तलाव परिसरात शोध घेतला असता ही दुर्दैवी घटना उघडकीस आली.

गावातील नागरिकांनी तत्काळ तलावातून मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी शिऊर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी भटाणा येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला. रहीम शेख यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत ते मासेमारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून शासनाने त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.